: प्रकरण तिसरे :

# संसदेतील स्त्री-सदस्यांची भूमिका
# (1947 ते 1990)

: प्रकरण तिसरे :

## संसदेतील स्त्री सदस्यांची भूमिका
## (1947 ते 1990)

संसदेतील महिला प्रतिनिधींच्या भूमिकेचा अभ्यास करताना संसदेतील त्यांनी केलेल्या योगदानाचे अवलोकन करणे आवश्यक व महत्त्वाचे वाटते. महिला प्रतिनिधींची भूमिका म्हणजे संसदेतील निर्णय निर्धारण प्रक्रियेत त्यांनी केलेला सहभाग होय. महिला प्रतिनिधींनी संसदेत कोणती विधेयके मांडली, कोणकोणत्या विधेयकांच्या चर्चेत सहभाग घेतला, त्यासंबंधी कोणकोणत्या शिफारशी सुचना केल्या, यासंबंधीच्या अभ्यासाचा समावेश करण्यात आलेला आहे. परंतु स्वातंत्र्योत्तर काळापासून ते आजपर्यंत संसदेतील स्त्रियांचा सहभाग आणि भूमिका हा अभ्यास एवढा व्यापक आहे की त्याचा पूर्णपणे या प्रकरणात समावेश करणे अशक्य आहे म्हणून 1947 ते 1990 असा मर्यादित स्वरूपाचा कालखंड विचारात घेऊन संसदेतील स्त्रियांचा सहभाग आणि भूमिका यांचा अभ्यास केलेला आहे. या कालखंडात स्त्रियांच्या अधिकारासंबंधीची तसेच त्यांच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने उपयुक्त ठरणारी काही विधेयके विचारात घेतलेली आहेत. अशी विधेयके, त्यासंबंधी झालेली चर्चा, त्यामधील महिला प्रतिनिधीचा सहभाग, त्यांनी केलेल्या शिफारशी अशा स्वरूपाचा मर्यादित परंतु विश्लेषणात्मक तसेच आतापर्यंत झालेल्या संसदेतील महत्त्वाच्या महिला प्रतिनिधींच्या सामाजिक व राजकीय कार्याची थोडक्यात ओळख करून देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय समाजसुधारकांचा प्रयत्न आणि ब्रिटिश शासनाचे सहकार्य यातून भारतीय स्त्रियांच्या सामाजिक दर्जात आणि अधिकारात काही प्रमाणात सुधारणा घडून आलेली आहे. त्याचीही नोंद येथे घेणे आवश्यक ठरते. अशा स्वरूपाचे पुढील काही कायदे संमत करण्यात आले.

- 1795 चा बालहत्या प्रतिबंधक कायदा
- 1829 चा सतीबंदीचा कायदा
- 1856 चा विधवा पुनर्विवाह कायदा

- 1891 चा वय संमतीचा कायदा
- 1929 चा शारदा कायदा (बालविवाह प्रतिबंधक कायदा )
- 1938 चा स्त्रियांचा घटस्फोटाचा अधिकार

स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांच्या स्वातंत्र्याबाबत प्रगती होण्यासाठी भारतीय राज्यघटनेत कलम 14, 15, 16 व 23 मध्ये स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने अधिकार प्रदान केलेले आहेत. स्त्री-पुरूष लिंगदरी कमी करण्याच्या दृष्टिकोनातून 1950 ते 1998 या काळात संसदेत स्त्रियांसंबंधीची विविध विधेयके मांडली गेली. या संदर्भात पुढील महत्त्वाचे कायदे संमत झाले.[2]

- नोकर राज्य विमा कायदा (1948)
- शेतमजूर कायदा (1951)
- विशेष विवाह कायदा (1954)
- हिंदू विवाह कायदा (1955)
- हिंदू वारसा कायदा (1956)
- कुटुंब न्यायालय कायदा (1956)
- हुंडा प्रतिबंधक सुधारणा कायदा (1961) (1984 व 1986 ची घटना दुरूस्ती)
- बालविवाह प्रतिबंधक सुधारणा कायदा (1976)
- समान वेतन कायदा (1976)
- गुन्हेगारी संबंधीचा कायदा (1983)
- अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा (1986)
- फॅक्टरी सुधारणा कायदा (1986)
- गर्भपातविषयीचा कायदा (1971)
- करारात्मक मजूर कायदा (1976)
- स्त्रियांच्या अनुचित प्रतिनिधित्वासंबंधीचा प्रतिबंधात्मक कायदा (1986)

याशिवाय स्त्रियांच्या संस्था, स्त्रियांचे आरोग्य, अन्न, जीवनावश्यक वस्तू, स्त्रियांचे संरक्षण व कायदेविषयक बाबी, संपत्ती, आर्थिक बाबी, तांत्रिक शिक्षण, उद्योगधंदे, रोजगार, कर इ. विषयांसंबधीची अनेक विधेयके संसदेपुढे मांडण्यात आली. त्यासंबंधी काही सुधारणा घडून आलेल्या दिसतात.

प्रस्तुत प्रकरणात संसदेत महिला प्रतिनिधीनी मांडलेल्या आणि संमत झालेल्या विधेयाकांचाच प्रामुख्याने विचार करण्यात आलेला आहे. गेल्या 50 वर्षाच्या कालखंडात ज्या महिला प्रतिनिधींनी कायदे निर्मितीच्या प्रक्रियेत भाग घेतला त्यापैकी काही प्रमुख महिला प्रतिनिधींचा उल्लेख पुढील प्रमाणे करता येईल.

राजकुमारी अमृत कौर, सुचेता कृपलानी, रेणू चक्रवर्ती, राधा कुमुद मुखर्जी, लक्ष्मी एन. मेनन, सुशीला गोपालन, उमा नेहरू, उषा प्रकाश चौधरी, सीता परमानंद, दुर्गाबाई देशमुख, मणीबेन वल्लभाई पटेल, सुषमा सेन, इंदिरा गांधी, कमलेंदु मती शहा, इंदिरा ए. मायदेव, सुभद्रा जोशी, पार्वती कृष्णन, रेणुका रे, के. भारती, तारकेश्वरी सिन्हा, व्हायोलेट अल्वा, दि. खोंगमेन, सावित्री निगम, ईला पॉल चौधरी, रूक्मिणीदेवी अरूंधले, बेगम सादिक किडवाई, मैमुना सुलतान, चपलकांता भट्टाचार्य, अनुसयाबाई काळे, सीता युधवीर, अनिस किडवाई, सुशीला नायर, जयाबेन वजुभाई शहा, नंदिनी सत्पथी, माफिदा अहंमद, यशोदा रेड्डी, कमला चौधरी, सुशीला रोहटगी, सरोजिनी महिषी, प्रतिभा सिंग, मुकुल बॅनर्जी, मृणाल गोरे, चंद्रावती लखनपाल, मार्गारेट अल्वा, गीता मुखर्जी, कु. सरोज पुरषोत्तम खापर्डे, उमा शंकर दिक्षीत, मार्गार्थेम चंद्रशेखर, कृष्णा साही अनुसयाबाई काळे, ताराबाई सप्रे, शारदा मुखर्जी, रोझा देशपांडे, ताराबाई साठे, शकुंतला परांजपे, प्रमिला दंडवते, कुसूम कृष्णमूर्ती, लक्ष्मी कुमारी चुंदावत, विद्या चेन्नूपत्ती, मनेका गांधी, शीला कौल, नजमा हेपतुल्ला, रेणुका चौधरी, सुमित्रा महाजन, राजेंद्रकुमारी वाजपेयी, मीरा कुमार विजयाराजे शिंदे, जयंती पटनाईक, प्रमिलाताई चव्हाण, ममता बॅनर्जी, सुषमा स्वराज्य इ. महिला प्रतिनिधीनी संसदेत विधेयके मांडली तसेच चर्चेत सहभाग घेतला.

संसदेतील महिला प्रतिनिधींच्या भूमिकेचे अवलोकन करताना काही विधेयकांचा (ज्यामध्ये स्त्रियांनी भाग घेतला) येथे ऊहापोह करणे क्रमप्राप्त: ठरते[3]

1. **भारतीय रूग्ण परिचारिका मंडळ (सुधारणा) कायदा, 1950.**

(The Indian Nursing Council (Amendment) Act 1950)

भारतीय रूग्ण परिचारिका कायदा 1947 मध्ये सुधारणा करण्यासाठी भारताच्या पहिल्या स्त्री आरोग्य मंत्री राजकुमारी अमृत कौर यांनी 13 डिसेंबर 1950 रोजी लोकसभेत भारतातील रूग्णपरिचारिका संबंधी विधेयक (नं. 103) मांडले. लोकसभेत 19 डिसेंबर 1950 रोजी हे विधेयक संमत झाले. [4]

2. **हुंडा प्रतिबंधक विधेयक -**

(Dowry Prohibition Bill)

12 एप्रिल 1951 रोजी हुंडा बंदीसाठी लोकसभेत (नं. 5 व नं. 29) अशी दोन विधेयके [5] जयश्री आणि उमा नेहरू यांनी लोकसभेत मांडली, त्यानंतर 1952 मध्ये जयश्री व दाभी (Dabhi) यांनी 16 जुलै 1952 रोजी लोकसभेत पुन्हा हे विधेयक मांडले. हुंडा प्रतिबंधक विधेयकासंबंधी लोकसभेत 28 ऑगस्ट 1953 रोजी चर्चा झाली. नंतर हे विधेयक पुन्हा चर्चेसाठी न आल्यामुळे ते आपोआपच रद्द झाले.

रेणू चक्रवर्ती यांनी पुन्हा 1958 साली लोकसभेमध्ये हे विधेयक [6] (नं. 27) मांडले परंतु तेही चर्चेसाठी न येताच रद्द झाले. त्यानंतर पुढे कायदा मंत्री ए. के. सेन यांनी 1959 साली हे हुंडाप्रतिबंधक विधेयक लोकसभेत मांडले आणि त्यावर सभागृहात 5 ऑगस्ट 1959 रोजी चर्चा झाली. त्यानंतर ते विधेयक राज्यसभेतही चर्चेसाठी ठेवले गेले आणि त्यानंतर यावर एक समिती नेमण्यात आली. त्यात 30 सदस्य लोकसभेतून व 15 सदस्य राज्यसभेतून घेण्यात आले व त्यांची एक संयुक्त समिती तयार करण्यात आली. या समितीने सुचविलेल्या शिफारशीचा अहवाल दोन्ही गृहांपुढे ठेवण्यात आला. 11 फेब्रू 1960 रोजी राज्यसभेने मंजूर केलेल्या शिफारशीसह या दुरूस्त्या लोकसभेने मान्य केल्या.

13 जून 1980 रोजी पुन्हा जनता दलाच्या खासदार प्रमिला दंडवते यांनी हे विधेयक [7] (नं. 90) लोकसभेपुढे मांडले. परंतु हे विधेयक खासगी विधेयक म्हणून फेटाळण्यात आले. त्यानंतर 20 ऑगस्ट 1986 रोजी हुंडाबंदी विधेयक (नं. 16) सभागृहापुढे कृष्णा साहीकडून मांडण्यात आले नाही, परंतु त्याच दिवशी काँग्रेसच्या खासदार मार्गारेट अल्वा यांनी राज्यसभेपुढे विधेयक (नं. 20) मांडले [8] या विधेयकात हुंडा पद्धती किती घातक प्रमाणात आहे आणि हुंडा प्रकरणी अनेक स्त्रियांनी कशी आत्महत्या केली यासंबंधी माहिती देवून हुंडा प्रतिबंधक कायदा अधिक कडक स्वरूपाचा करावा असे सांगितले. हुंडा

घेणाऱ्यास 5 वर्षाची शिक्षा आणि 15 हजार रू. दंड करण्यात यावा असे सुचविले, तसेच हुंडा प्रकरणी होणाऱ्या मृत्युला हुंडाबळी (Dowry Death ) असे संबोधावे. मार्गरेट अल्वा यांनी सुचविलेल्या शिफारशी हुंडाप्रतिबंधासाठी अत्यंत उपयुक्त ठरल्या गेल्या.

1961 साली हुंडा प्रतिबंधाचा जो कायदा पास झाला त्यामध्ये संसदेच्या संयुक्त समितीकडून काही सुधारणा, शिफारशी करण्यात आल्या तरीपण 1984 च्या हुंडा प्रतिबंधाच्या कायद्यातील केलेल्या सुधारणा अजूनही अपूर्ण वाटू लागल्यामुळे 1986 साली पुन्हा त्यात सुधारणा करण्यात आल्या. एकंदरीत हुंडाप्रतिबंधक कायद्याच्या निर्मितीमध्ये व सुधारणेमध्ये महिला प्रतिनिधीचा सिंहाचा वाटा आहे.

संसदेत जेव्हा हुंडाबळीचे विधेयक मंजूर झाले तेव्हा पंतप्रधान पंडित नेहरू म्हणाले होते की, -``केवळ कायदा करून समाजातील दुष्ट रूढीचे निर्मूलन करता येणार नाही. या रूढीच्या विरूद्ध चळवळ होवून समाजमानस तयार झाले पाहिजे. तरीही आपण हुंडाबंदीचा कायदा केलाच पाहिजे. कारण त्यामुळे अन्याय करणाऱ्यांना या कायद्यानुसार शिक्षा करण्याचा अधिकार सरकारला मिळतो, शिवाय अशा कायद्यामुळे समाजाचे शिक्षणही होते.`` हुंडाबंदी कायदा होवून इतकी वर्षे लोटली तरी तो कायदा पुस्तकातच राहिला आहे आपल्या समाजात हुंडाबंदी चळवळ यशस्वी होवू शकली नाही.[9]

## 3 स्त्री कामगारांना समान कामासाठी समान वेतन -

(Equal Pay for Equal work for Women Workers)

रेणू चक्रवर्ती यांनी यासंबंधीची दोन विधेयके मांडली[10] नं. 26 हे 23 मार्च 1956 रोजी आणि विधेयक [11] नं 73 हे 6 डिसेंबर 1957 रोजी लोकसभेत मांडले. या विधेयकात स्त्री कामगारांना समान कामासाठी समान वेतन दिले पाहिजे अशी भूमिका मांडण्यात आली. उद्योगधंदे, शेती या व्यवसायातील अकुशल स्त्री पुरूष मजुरांना समान वेतन द्यावे, त्यांचे कौशल्य, अनुभव, कार्यक्षमता आणि जबाबदारी यांचा विचार करुन त्यांच्या वेतनात फरक ठेवणे योग्य होईल, परंतु लिंगभेदावरून स्त्री-पुरूष कामगारांच्या वेतनात फरक असता कामा नये.

पुढे सुशीला गोपालन यांनी यासंबंधीचे विधेयक (नं. 50) 22 एप्रिल 1983 रोजी लोकसभेत मांडले. [12] ही सर्व विधेयके रद्द झाली. पुढे 9 डिसेंबर 1987 रोजी बिमा घोष गोस्वामी यांनी

खासदार वैंजयतीमाला यांच्या मदतीने 81 नंबरचे विधेयक [13] सभागृहापुढे चर्चेस आणले. लोकसभेने हे विधेयक मंजूर केले.

## 4. अन्न भेसळ प्रतिबंधक विधेयके -

(Prevention of Food Adulteration Bills)

श्रीमती राजकुमारी अमृत कौर यांनी अन्नातील भेसळीला प्रतिबंध करण्यासंबंधीचे विधेयक [14] (नं. 101) 8 ऑक्टोबर 1952 रोजी लोकसभेत मांडले. नंतर नोव्हेंबर महिन्यात हे विधेयक चिकित्सा समितीकडे पाठविण्यात आले. या समितीने आपला अहवाल 14 फेब्रूवारी 1953 रोजी सभागृहापुढे सादर केला. 23 ऑगस्ट 1954 रोजी या विधेयकाला मान्यता देण्यासंबंधी विचारविनिमय झाला. 1954 मध्ये ऑगस्टच्या 26 तारखेला हे विधेयक लोकसभेने पास केले आणि त्याच महिन्याच्या 16 तारखेला राष्ट्रपतीच्या सहीने त्याचे कायद्यात रूपांतर झाले.

अन्न भेसळ प्रतिबंधाविषयी आणखी एक विधेयक (नं. 59) 20 डिसेंबर 1963 रोजी सुशीला नायर यांनी लोकसभेत मांडले.[15] हे विधेयकही डॉ. सरोजिनी महेशी यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या दोन्ही गृहाच्या संयुक्त समितीकडे पाठविण्यात आले. संयुक्त समितीकडून या विधेयकासंबंधी अहवाल मिळाल्या नंतर या विधेयकाला लोकसभेत 26 नोव्हेंबर 1964 रोजी संमती मिळाली.

वरील दोन्ही विधेयकां शिवाय आणखी अन्नभेसळ प्रतिबंधक विधेयक आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री श्रीमती सरोज पुरषोत्तम खापर्डे यांनी 8 डिसेंबर 1986 रोजी लोकसभेत मांडले. आणि हे विधेयक 9 डिसेंबर 1986 रोजी संमत होवून राष्ट्रपतीच्या सहीसाठी पाठविण्यात आले.

## 5) हिंदू निपुत्रिक विधवांच्या मालमत्तेच्या अधिकारासंबंधीचे विधेयक -

(Hindu Law Governing Childless Widows Right to property)

श्रीमती राधा कुमुद मुखर्जी यांनी 4 सप्टेंबर 1953 रोजी राज्यसभेत हिंदू निपुत्रिक विधवा स्त्रियांच्या वारसा हक्काने मिळणाऱ्या मालमत्ताविषयीच्या हक्का संबंधीचे विधेयक [16] (नं. 14) राज्यसभेत

मांडले. हिंदू कायद्यानुसार निपुत्रिक विधवा स्त्रियांना वारसा हक्काने तिच्या पतीची संपत्ती मिळणे आवश्यक आहे. त्या संपत्तीचा उपभोग घेण्याचा तसेच त्या संपत्तीचा विनियोग करण्याचा किंवा दुसऱ्याच्या नावे करण्याचा अधिकार तिला प्राप्त झाला पाहिजे अशा वारसा हक्काने प्राप्त झालेल्या सपंत्तीवरचा अधिकार निपुत्रिक विधवा स्त्रियांना पूर्णपणे असला पाहिजे. राज्यसभेत या विधेयकावर फारशी चर्चा न होता ते रद्द करण्यात आले.

## 6) स्त्रियांच्या प्रसुती काळातील वेतन आणि वैद्यकीय सुविधा बाबतचे विधेयक

(Payment of Maternity and Medical Benefits to women)

श्रीमती रेणू चक्रवर्ती यांनी 5 एप्रिल 1958 रोजी विधेयक [17] (नं. 35) लोकसभेत मांडले उद्योगधंदे, शेती आणि इतर व्यवसायात काम करणाऱ्या स्त्रियांना प्रसुतीपूर्व आणि नंतरच्या काळात वेतन आणि वैद्यकीय सेवा मिळणे आवश्यक आहे. स्त्रियांच्या आरोग्य संवर्धनासाठी असा कायदा होणे अत्यंत गरजेचे आहे. या उद्देशाने एक विधेयक सुशिला गोपालन यांनी 21 नोव्हेंबर 1969 रोजी लोकसभेत मांडले. आणखी एक अशाच प्रकारचे विधेयक 17 ऑगस्ट 1988 रोजी लोकसभेपुढे मांडण्यात आले, परंतु ही सर्व विधेयके लोकसभेपुढे चर्चेस आलीच नाहीत त्यामुळे ती रद्द झाली.

## 7) हाज समिती प्रस्थापनेबाबतचे विधेयक -

(Establishment of Haj Committee)

लक्ष्मी एन मेनन यांनी हाज समिती स्थापणे बाबतचे विधेयक [18] (नं. 78) लोकसभेत 1959 साली मांडले. 1932 च्या पोर्ट हाज कमिटी ॲक्ट मध्ये सुधारणा करून मुस्लीम यात्रेकरूसाठी सौदी अरेबिया, सिरिया, इराक, इराण, जॉर्डन या देशांत जाण्यासाठी मुंबई बंदरात हाज समिती स्थापन करण्याच्या उद्देशाने हे विधेयक मांडण्यात आले. संसदेने मंजूर केलेल्या या विधेयकाचे 8 फेब्रूवारी 1960 रोजी राष्ट्रपतीच्या संमतीने कायद्यात रूपांतर झाले.

8) <u>दिल्लीचा विकास -</u>

<u>(Development of Delhi)</u>

9 डिसेंबर 1963 रोजी महिला प्रतिनिधी सुशिला नायर यांच्या वतीने उपआरोग्यमंत्री डी. एस. राजू यांनी दिल्ली विकासाबाबतचे विधेयक [19] (नं. 55) मांडले. 1957 च्या दिल्ली विकास कायद्यात दुरूस्ती करण्याच्या उद्देशाने सुशिला नायर यांनी हे विधेयक मांडले. दिल्ली शहरात रस्ता रूंदीकरणाच्या योजनेची (मास्टर प्लॅन) अंमलबजावणी सुलभ व जलद गतीने होण्यासाठी तसेच या कामासाठी लागणाऱ्या खर्चाची तरतूद करण्यासाठी दिल्ली विकास कायद्यात सुधारण घडवून आणणे आवश्यक होते. 20 डिसेंबर 1963 रोजी हे दुरूस्ती विधेयक लोकसभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आले.

9) <u>भारतातील देवदासी आणि मुरळी पद्धती निर्मुलनाबाबतचे विधेयक</u>

<u>(Abolition of the Practice of Devdasi and Murli in India)</u>

महाराष्ट्राच्या महिला प्रतिनिधी उषा प्रकाश चौधरी यांनी 30 एप्रिल 1982 रोजी हे विधेयक [20] (नं. 61) लोकसभेत मांडले. देवदासी व मुरळी पद्धती शतकानुशतके भारतात चालत आलेली एक अत्यंत वाईट सामाजिक प्रथा आहे, या प्रथेनुसार मुलीचे आई वडिल आपल्या मुलीला बालपणी देवाला अर्पण करतात. अशा मुलीना आयुष्यभर देवाची दासी म्हणून जीवन कंठावे लागते. मुरळी पद्धतीत मुलीचे लग्न देवाशी लावले जाते. महाराष्ट्र व कर्नाटकात मुरळी व देवदासी पद्धती आढळून येतात. मुरळी, देवदासी झालेल्या स्त्रियांचा सामाजिक दर्जा कनिष्ठ समजला जावून समाजाकडून अशा स्त्रियांचे सामाजिक व शारिरीक शोषण केले जाते. अशा स्त्रियांना झालेल्या मुलांना आपल्या आईचे नाव लावावे लागते. या पद्धतीमुळे स्त्री जातीवर अन्याय होवून त्यांचे शोषण होत असते, तेव्हा देवदासी व मुरळी पद्धती यांचे निर्मुलन होण्यासाठी कायदा होणे आवश्यक आहे. अशा कायद्यामुळे आईच्या संपत्तीचा वारसा हक्क त्यांच्या मुलांना मिळू शकेल. तसेच शासकीय आणि बिगर शासकीय क्षेत्रांत या कायद्यानुसार त्यांना आपल्या आईचे नाव लावता येईल. उषा चौधरी यांनी लोकसभेत मांडलेले हे विधेयक चर्चेस येवू शकले नाही त्यामुळे हे विधेयक रद्द झाले.

## 10) भारतातील विवाहाची सक्तीने नोंदणी होण्याबाबतचे विधेयक -

(Compulsory Registration of Marraiges in India)

श्रीमती विद्या चेन्नूपत्ती यांनी सक्तीने विवाहाची नोंदणी होण्याबाबतचे विधेयक [21] (नं. 54) 30 एप्रिल 1982 रोजी लोकसभेत मांडले. भारतीय विवाह पद्धती ही संस्कारातून होत असते. तर ख्रिश्चन पारशी समाजात विवाह नोंदणीचे कायदे करण्यात आलेले आहेत, परंतु हिंदू समाजात असा विवाह नोंदणीचा कायदा नाही. विवाह नोंदणी नसल्यामुळे पतीकडून पत्नीचे विविध मार्गाने शोषण होत राहीले. हुंडापद्धती, द्विभार्या पद्धती अशा अनिष्ठ गोष्टी यातून निर्माण झाल्या. तेव्हा सक्तीने विवाह नोंदणी संबंधीचा कायदा होणे आवश्यक आहे या उद्देशाने हे विधेयक मांडण्यात आले. 1955 च्या हिंदू विवाह कायद्यात (कलम 8) राज्यांना सक्तीचा विवाह नोंदणी कायदा करण्याबाबतचा विकल्प देण्यात आलेला होता. परंतु सक्ती करण्यात आली नव्हती. 1982 मध्ये श्रीमती प्रमिला दंडवते यांनी सक्तीने विवाह नोंदणी होण्याबाबतचे विधेयक [22] (नं. 92) लोकसभेत मांडले. बहुपत्नीत्वाची पद्धती आणि आर्थिक असुरक्षितता यापासून स्त्रियांची मुक्तता होण्यासाठी तसेच हुंडाबळी, स्त्रियांचे मानसिक व शारिरीक छळ यांना प्रतिबंध घालण्यासाठी सक्तीने विवाहाची नोंदणी होणे आवश्यक आहे. या उद्देशाने ही विधेयके लोकसभेत मांडण्यात आली. परंतु या विधेयकांवर सभागृहात चर्चा घडून न आल्यामुळे ती विधेयके रद्द झाली.

## 11) हिंदू अल्पसंख्याक आणि पालकत्व कायदा (1956) मध्ये दुरूस्ती करण्याबाबतचे विधेयक -

(Hindu Minority and Guardianship)

श्रीमती सीता परमानंद यांनी हे विधेयक (नं. 19) 1960 मध्ये लोकसभेत मांडले.[23] 1956 च्या हिंदू अल्पसंख्याक आणि पालकत्व कायद्यात दुरूस्ती करून आईला वडिलांच्या बरोबरीने पालकत्वासंबंधीचे अधिकार देण्याच्या उद्देशाने हे विधेयक मांडण्यात आले. मुलीचे लग्न होईपर्यंत आणि मुलांच्या वयाला 10 वर्षे पूर्ण होईपर्यंत नैसर्गिक पालकत्वाची जबाबदारी मुलीला मिळावी ही तरतूद या विधेयकात करण्यात आली.

सीता परमानंद यांनी लोकसभेत मांडलेले हे विधेयक सभागृहामुळे चर्चेस आले नाही त्यामुळे ते आपोआपच रद्द झाले.

12) <u>दत्तक विधानासंबंधीचे विधेयक -</u>

<u>(Adoption of Children)</u>

डॉ. मंगला देवी तलवार यांनी 1970 साली दत्तक विधाना संबंधीचे हे विधेयक [24] (नं. 7) राज्यसभेत मांडले. मुलांना दत्तक घेताना जी पद्धती वापरली जाते- तिच्यात एकवाक्यता व समानता निर्माण करण्याच्या उद्देशाने हे विधेयक मांडण्यात आले. दत्तक विधानात मुलांना दत्तक घेतले जाते. परंतु मुलीना दत्तक घेतले जात नाही. दत्तक विधानासंबंधीचा कायदा सर्व जमातीना समान पद्धतीने लागू होणे आवश्यक आहे. केवळ हिंदूनाच त्याचा फायदा मिळता कामा नये. मुलाप्रमाणेच मुलीचे दत्तक विधानासंबंधीचा कायदा आवश्यक आहे.

मंगलादेवी यांनी मांडलेल्या या विधेयकावर राज्यसभेत चर्चाच होवू शकली नाही.

13) <u>वृत्तपत्रमूल्य नियंत्रणासंबंधीचे विधेयक -</u>

<u>(Price Control of Newspapers)</u>

24 नोव्हेंबर 1971 रोजी वर्तमानपत्राच्या किंमतीवर नियंत्रण ठेवण्यासंबंधीचे विधेयक [25] (नं. 75) लोकसभेत श्रीमती नंदिनी सत्पथी यांनी मांडले. वर्तमानपत्राच्या किंमतीवर योग्य प्रकारे नियंत्रण ठेवून लोकांना वाजवी किंमतीत वृत्तपत्रे उपलब्ध व्हावीत या उद्देशाने हे विधेयक लोकसभेत मांडले गेले, परंतु त्यावर चर्चा न झाल्यामुळे हे विधेयक आपोआपच रद्द झाले.

14) <u>नागरी मालमत्तेवरील मर्यादेसंबंधीचे विधेयक -</u>

<u>(Cieling on Urban Property)</u>

श्रीमती शारदा मुखर्जी यांनी शहरी मालमत्तेवर मर्यादा घालण्यासंबंधी 1969 साली

लोकसभेत विधेयक [26] (नं. 96) मांडले. शहरातील जमिनी आणि इमारती तसेच कर चुकवेगीरीतून मिळालेली संपत्ती यावर मर्यादा घालण्यासंबंधी आणि शहरी भागातील नियोजन, वैज्ञानिक विकास साधण्यासाठी हे विधेयक मांडण्यात आले. शहरी संपत्तीवरील मर्यादा आणि जादा संपत्तीबद्दल नुकसानभरपाई देण्याची तरतूद या विधेयकात करण्यात आलेली होती. शारदा मुखर्जी यांनी लोकसभेत मांडलेल्या विधेयकावर चर्चा न झाल्यामुळे ते विधेयक रद्द झाले.

**15) <u>हानीकारक प्रकाशने आणि चित्रपट याबरील बंदीविषयक विधेयके -</u>**

<u>(Harmful Publications and Films for Young Persons)</u>

1960 साली श्रीमती चपलकांता भट्टाचार्य यांनी हानीकारक प्रकाशने आणि चित्रपटे यावर बंदी घालण्यासंबंधी लोकसभेत विधेयक [7] (नं. 101) मांडले. अनावश्यक चित्रपट आणि प्रकाशित पुस्तके यामुळे तरूण वर्गाच्या मनावर वाईट परिणाम होवून त्यांच्यात गुन्हेगार वृत्ती वाढते. तेव्हा रविंद्रनाथ टागोर, महात्मा गांधी, फैज्जाज खान यांच्या ध्वनीफिती आणि भाषणे यांची जोपासना करून तरूण पिढीला स्फूर्ती देण्याच्या उद्देशाने हे विधेयक मांडण्यात आले.

चंपलकांता भट्टाचार्य यांनी मांडलेल्या विधेयकावर चर्चा न झाल्यामुळे हे विधेयक आपोआपच रद्द झाले.

**16) <u>दिल्ली भाडेनियंत्रण कायद्याबाबतचे विधेयक -</u>**

<u>(Delhi Rent Control Act)</u>

1983 साली नजमा हेपतुल्ला यांनी राज्यसभेत दिल्ली भाडे नियंत्रण कायद्यात सुधारणा करण्यासाठी हे विधेयक (नं. 7) मांडले. घरमालक व भाडेकरू यांच्यात समन्वय साधून भाडे नियंत्रण कायद्यात दुरूस्ती करण्यासाठी हे विधेयक लोकसभेत मांडण्यात आले.

पुढे 1988 साली मोहसिना किडवाई यांनी राज्यसभेत भाडे नियंत्रण कायद्यात दुरूस्ती करण्याबाबतचे विधेयक मांडले. नजमा हेपतुल्ला यांनी मांडलेले विधेयक लोकसभेत चर्चेसाठी न

घेतल्यामुळे ते रद्द झाले, परंतु मोहसिना किडवाई यांनी मांडलेले विधेयक (नं. 25) दोन्ही गृहात 1 सप्टेंबर 1988 रोजी संमत झाले.[29] या विधेयकाला 3 नोव्हेंबर 1988 रोजी राष्ट्रपतीची संमती मिळून त्याचे कायद्यात रूपांतर झाले.

## 17) भारतात जाती विरहीत, वर्गविहिन आणि धर्मविहिन समाज निर्माण करण्यासंबंधीचे विधेयक -

(Promotion of Casteless or classless and Religionless society in India)

श्रीमती विद्या चेन्नूपत्ती यांनी हे विधेयक (नं. 72 ) लोकसभेत 6 मे 1983 रोजी मांडले.[30] भारतीय समाजात धर्म, जात, भाषा, जमातवाद हे घटक राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गातील अडसर असून ते दूर करण्यासाठी शिक्षणसंस्था, लोकसेवा आयोग यामध्ये जातीचा, धर्माचा उल्लेख होता कामा नये. संबंधित क्षेत्रातील व्यक्तीच्या अर्जावर जात, धर्म, वर्ग यांची नोंद ठेवणारा कॉलम असता कामा नये. की ज्याचा परिणाम सार्वजनिक जीवनावर होवू शकणार नाही. अशा उद्देशाने विद्या चेन्नूपत्ती यानी हे विधेयक लोकसभेत मांडले परंतु या विधेयकावर चर्चा न झाल्यामुळे ते रद्द झाले.

## 18) राजघाट समाधीबाबतचे विधेयक

(The Rajghat Samadhi)

श्रीमती मोहसिना किडवाई यांनी हे विधेयक 1988 मध्ये राज्यसभेत मांडले. 1951 साली केलेल्या राजघाट समाधी कायद्यात दुरूस्ती करण्याच्या उद्देशाने हे विधेयक मांडण्यात आले. या कायद्यानुसार राजघाट समाधी समितीमध्ये लोकसभा व राज्यसभा यातून प्रत्येकी एक सभासद घेतला जात असे परंतु घटनेच्या 102 कलमाखाली समाधी भंगाच्या संदर्भात या दोन सदस्यांना अपात्र ठरविण्यात येते असे मत संसदीय संयुक्त, समितीने मांडले. तेव्हा राजघाट समाधी समितीच्या या सदस्यांना आपल्या पदाविषयी संरक्षण मिळण्याबाबत या कायद्यात दुरूस्ती करण्यासंबंधीचे हे विधेयक मांडण्यात आले.

श्रीमती मोहसिना किडवाई यांच्या वतीने नागरी विकास राज्यमंत्री दलबीर सिंग यांनी हे

विधेयक (नं. 15) 11 मे 1988 रोजी लोकसभेत मांडले. [31] संसदेच्या दोन्ही गृहाची संमती मिळाल्या नंतर हे विधेयक राष्ट्रपतीच्या संमतीने पास केले.

**19) बालगुन्हेगारी संबंधी विधेयक -**

(Protection, Trealment, Development and Rehabilitation of Neglected or Delinquent juveniles)

श्रीमती राजेंद्रकुमारी वाजपेयी यांनी बालगुन्हेगारांची काळजी, संरक्षण, त्यांना देण्यात येणारी वागणूक त्याचा विकास आणि पुनर्वसन या उद्देशाने हे विधेयक (नं. 103) लोकसभेत 5 नोव्हेंबर 1986 रोजी मांडण्यात आले. बालगुन्हेगारीच्या संबंधातील न्यायदानात संपूर्ण देशात समानता असावी, बालगुन्हेगारांचा सर्वांगिण विकास होण्यासाठी व त्याची बालगुन्हेगारी कमी होण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. अशी घटनात्मक तरतूद होण्यासाठी हे विधेयक मांडण्यात आले. लोकसभेने या विधेयकाला मंजुरी दिली.[32]

**20) दिल्ली विद्यापीठासंबंधीचे विधेयक -**

(The University of Delhi)

श्रीमती शीला कौल यांनी दिल्ली विद्यापीठ दुरूस्ती विधेयक (नं. 99) 20 ऑगस्ट 1981 रोजी लोकसभेत मांडले. शिक्षण व समाजकल्याण राज्यमंत्री शीला कौल यांनी मांडलेले हे दिल्ली विद्यापीठाचे विधेयक 26 ऑगस्ट 1981 रोजी लोकसभेत मंजूर झाले. त्यानंतर राष्ट्रपतीच्या संमतीने त्याचे कायद्यात रूपांतर झाले.

विविध राजकीय पक्षांच्या समित्यांमध्ये महिलांचे प्रमाण फारच कमी आहे हे पुढील तक्त्यावरून समजून येते.

<u>निर्णय निर्धारण समित्यांमधील स्त्रियांचा सहभाग</u>

| पक्ष | समिती | स्त्रियांची संख्या | एकूण सदस्य संख्या | | स्त्रियांचे प्रमाण टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|---|
| मार्क्सवादी साम्यवादी पक्ष | 1) पॉलिट ब्युरो | 0 | → | 15 | → | 0 |
| | 2) मध्यवर्ती समिती | 5 | → | 70 | → | 7 |
| भारतीय साम्यवादी पक्ष | 1) सचिवालय | 0 | → | 9 | → | 0 |
| | 2) राष्ट्रीय कार्यकारिणी | 3 | → | 31 | → | 10 |
| | 3) राष्ट्रीय मंडळ | 7 | → | 125 | → | 5 |
| जनता दल | 1) राजकीय व्यवहार समिती | 0 | → | 15 | → | 0 |
| | 2) संसदीय मंडळ | 0 | → | 15 | → | 0 |
| | 3) राष्ट्रीय कार्यकारिणी | 11 | → | 75 | → | 15 |
| युनायटेड फ्रंट | नियंत्रक समिती | 0 | → | 17 | → | 0 |
| भारतीय जनता पक्ष | 1) संसदीय मंडळ | 1 | → | 9 | → | 11 |
| | 2) निवडणूक समिती | 2 | → | 17 | → | 12 |
| कॉंग्रेस पक्ष | कार्यकारी समिती | 2 | → | 19 | → | 11 |

(Ref. Seminar, 497, sept. 1997.)

भारतीय संसदेतील महत्त्वाच्या महिला प्रतिनिधींच्या सामाजिक व राजकीय कार्याची ओळख करून देणे

क्रमप्राप्त ठरते. श्रीमती दुर्गा देशमुख, सुचेता कृपलानी, राजकुमारी अमृत कौर, सरोजिनी महिषी, सुशिला आडिवरेकर, उषा प्रकाश चौधरी, सुशिला रोहटगी, राजेंद्र कुमारी वाजपेयी, सुशिला नायर, शीला कौल, तारकेश्वरी सिन्हा, बिमा घोष, सुभद्रा जोशी, नजमा हेपतुला, गंगादेवी, मार्गारेट अल्वा, इंदिरा गांधी, प्रतिभा पाटील, सुमित्रा महाजन इत्यादी महिला प्रतिनिधींचा जीवनपरिचय व कार्य यांचा आढावा पुढील प्रमाणे घेण्यात आले आहे.

**1. <u>श्रीमती दुर्गाबाई देशमुख</u> -**

भारताचे माजी अर्थमंत्री सी. डी. देशमुख यांच्या त्या पत्नी होत. त्यानी संसदीय कामकाजात भाग घेऊन अनेक विधेयकांना पाठिंबा दर्शविला भारतीय संसद आणि राज्य विधीमंडळे यातील सदस्यांची पात्रता, साठेबाजी, औद्योगिक न्यायालये, अन्न परिस्थिति आणि राज्याची स्वायतत्ता, रेल्वे अपघातातून होणारी मानवी जीवनाची हानी, अखिल भारतीय नभोवाणी, वाहतूक , शिक्षण, अंदाजपत्रक, राष्ट्रपतीचे अभिभाषण, रेल्वे वॅगन्स आणि ट्रक्स, दुष्काळ परिस्थिती, मालक - कामगार संघर्ष इत्यादी विषयासंबंधी झालेल्या संसदीय चर्चेत त्यानी आवेषपूर्ण भाग घेतलेला होता.

**2. <u>श्रीमती विजया लक्ष्मी पंडित</u> -**

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या भगिणी श्रीमती विजया लक्ष्मी पंडित यांचा जन्म 18 ऑगस्ट 1900 रोजी झाला. 1930 आणि 1932 च्या राष्ट्रीय काँग्रेसच्या आंदोलनात त्यांनी सक्रिय भाग घेतला होता. 1936 साली त्या अलाहाबाद म्युनिसिपल बोर्डाच्या सदस्या होत्या. 1936 आणि 1946 साली त्या उत्तर प्रदेश विधानसभेवर निवडून गेल्या. उत्तर प्रदेश सरकारच्या मंत्रिमंडळात स्थानिक स्वराज्य आणि आरोग्य खात्याच्या मंत्री होत्या. भारतात प्रथम महिला मंत्रीपद मिळण्याचा मान त्यांना मिळालेला होता. 1940 ते 42 मध्ये त्या अखिल भारतीय महिला परिषदेच्या अध्यक्षा होत्या. 1946 साली पुन्हा त्या उत्तरप्रदेश मंत्रिमंडळात मंत्री झाल्या. 1946 ते 1953 या काळात त्यांनी युनोत भारताचे प्रतिनिधीत्व केले. 1947 ते 49 मध्ये रशियात आणि 1949 ते 52 मध्ये अमेरिकेत त्यांनी भारताचे राजदूत म्हणून काम केले. 1953 ते 54 मध्ये त्या इंग्लंडच्या हाय कमिशनवर होत्या. 1962 ते 64 मध्ये त्या महाराष्ट्राच्या राज्यपाल

होत्या. 1964 ते 67 मध्ये त्या लोकसभेच्या सदस्या होत्या. 1968 साली त्यांनी लोकसभेच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला.

### 3. श्रीमती राजकुमारी अमृत कौर -

श्रीमती राजकुमारी अमृता कौर ह्या पंडित नेहरूच्या मंत्रिमंडळात पहिल्या महिला आरोग्य मंत्री होत्या. दुसऱ्या महायुद्धातील त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण वाटते. त्यांचा संसदेतील सहभाग आणि त्यांनी मांडलेली विधेयके यासंबंधीची विशेष नोंद संसदेच्या इतिहासात झालेली आहे. अन्न आणि दूध भेसळ प्रतिबंधक विधेयक, कुटुंब नियोजन, विश्वस्त निधीतील सुधारणा इत्यादी आयुर्वेदिक आणि होमिओपॅथिक देशी औषधांचे उत्पादन इत्यादी विषयाबाबतच्या संसदीय चर्चेत त्यांचा सहभाग मोठा होता. याशिवाय भारतीय परिचारिका मंडळ 1950 च्या कायद्यातील दुरूस्ती विधेयक, अन्न भेसळ प्रतिबंधक विधेयक 1952, पंजाब नगरपालिका कायदा 1952, दंतवैद्यासंबंधीचे विधेयक (1954) औषधे आणि प्रसाधने विधेयक 1954 . इत्यादी विधेयके त्यांनी संसदेत मांडली.

### 4. श्रीमती सुचेता कृपलानी -

सुचेता कृपलानी यांचा जन्म 1908 साली झाला. त्यांचे शिक्षण दिल्ली आणि पंजाब विद्यापीठात झाले. समाजवादी नेते आचार्य कृपलानी यांच्या त्या पत्नी होत. 1941-42 मध्ये त्या अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीच्या महिला विभागाच्या सचिव होत्या. 1948-51 या काळात कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या सदस्या होत्या, तसेच विधान सभेच्या सदस्या होत्या. 1949 साली त्यांनी युनोमध्ये भारताचे प्रतिनिधीत्व केले. 1951 मध्ये त्यांनी कॉंग्रेस पक्षाचा राजीनामा देवून किसान मजदूर पक्षात प्रवेश केला. 1952 मध्ये त्या प्रजा समाजवादी पक्षाच्या क्रियाशील सदस्या होत्या. 1952 ते 1957 या काळात त्या प्रजा समाजवादी पक्षातर्फे लोकसभेच्या प्रतिनिधी होत्या. 1958 साली पुन्हा त्या कॉंग्रेस पक्षात आल्या. 1960 ते 63 या काळात त्या उत्तरप्रदेश मंत्रीमंडळात मजूर मंत्री होत्या. 1963 ते 67या काळात त्या उत्तरप्रदेशच्या मुख्यमंत्री होत्या. भारतात पहिल्या महिला मुखमंत्री होण्याचा बहुमान त्यांना मिळाला. 1967 साली त्या पुन्हा लोकसभेवर निवडून आल्या. लोकसभेच्या कामकाजातील त्यांचा सहभाग आणि क्रियाशिलता वाखणाण्याजोगी आहे. पुढील विविध प्रश्नासंबंधी आणि विधेयकांसंबंधी त्यांनी लोकसभेच्या चर्चेत भाग

घेतला.

## 5. श्रीमती इंदिरा गांधी -

श्रीमती इंदिरा गांधी यांचा जन्म 19 नोव्हेंबर 1917 रोजी झाला. त्यांचे शिक्षण विश्वभारती कॉलेज, शांती निकेतन, पुणे, मुंबई आणि ऑक्सफार्ड विद्यापीठांत झाले. भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या त्या कन्या होत. त्याना बालपणापासूनच राजकारणाचा फार मोठा वारसा लाभलेला होता. लहानपणापासून त्यांचा सामाजिक व राजकीय कार्याकडे ओढा होता. 1930 साली त्यांनी बालचरखा संघ आणि वानरसेना संघटना स्थापन केली होती. पुणे विद्यापीठात असताना त्यांनी अस्पृशता निवारण्याचे कार्य केले. 26 फेब्रूवारी 1942 रोजी त्यांचा फिरोज गांधीबरोबर विवाह झाला. 11 सप्टेंबर 1942 रोजी गांधीजींच्या चलेजावच्या चळवळीत त्यानी भाग घेतला, तेव्हा त्यांना 13 महिन्याची तुरुंगवासाची शिक्षा झालेली होती. 1959 साली त्यांची अखिल भारतीय काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदी निवड झाली. 1960 साली त्यांच्या पतीचे निधन झाले. त्याचवर्षी त्यांना येल विद्यापीठाचे हाऊलँड मेमोरियल पारितोषिक मिळाले. 1962 साली त्या राष्ट्रीय संरक्षण मंडळाच्या सदस्या होत्या. 1964 साली उत्तरप्रदेश विधानसभेतून त्यांची राज्यसभेवर निवड झाली. दरम्यान लालबहादूर शास्त्री यांच्या मंत्रीमंडळात त्या माहिती आणि नभोवाणी खात्याच्या मंत्री झाल्या. 1965 साली युनेस्को कार्यकारिणीच्या बैठकीस त्या उपस्थित राहिल्या. त्याचवर्षी रोमन अकादमीने राजधुरंधर महिला म्हणून `इझाबेल डी एस्टे` हे पारितोषिक त्यांना देण्यात आले. 1966 साली अखिल भारतीय काँग्रेस पक्षाच्या नेतेपदी त्यांची निवड झाली. नंतर 24 जानेवारी 1966 रोजी त्यांची भारताच्या पंतप्रधानपदी निवड झाली. त्याचवर्षी त्यांनी फ्रान्स, रशिया, अमेरिका या देशांना भेटी दिल्या. 1969 साली इंदिरा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या कुलपती झाल्या. 1971 साली मध्यावधी लोकसभेची निवडणूक होवून त्यांची पंतप्रधानपदी पुन्हा निवड झाली.[33] 18 डिसेंबर 1971 रोजी त्यांना भारतरत्न ही सन्माननीय पदवी मिळाली.

## संसदेतील कार्य -

पंतप्रधानपदाची भूमिका या नात्याने त्यांचे संसदेतील कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

1969 साली त्यांनी बँकाचे राष्ट्रीयकरण केले. 1971 साली त्यांनी जनरल इन्शुरन्सचे राष्ट्रीयकरण केले, तसेच कोळसा उद्योगधंद्यांचेही राष्ट्रीयकरण केले. 1 सप्टेंबर 1970 रोजी सामाजिक न्यायासाठी त्यांनी संस्थानिकांचे तनखेबंदीचे विधेयक लोकसभेत मांडले. लोकसभेने ते विधेयक मंजूर केले. राज्यसभेने ते विधेयक फेटाळले. तरीपण राष्ट्रपतीने वटहुकुमाद्वारे संस्थानिकांचे तनखे रद्द केले. पुढे मध्यावधी निवडणुकीनंतर 1 जानेवारी 1972 रोजी 25 वी घटनादुरूस्ती विधेयक होवून संस्थानिकांचे तनखे रद्द केले. 1971 च्या काँग्रेस जाहिरनाम्यात त्यांनी गरीबी हटाओ अशी घोषणा केली. दरम्यान भारत-पाक युद्ध होऊन बांगलादेश निर्माण झाला. पंतप्रधान इंदिरा गांधीच्या सहकार्यामुळे बांगलादेश निर्माण झाला. 1 जुलै 1975 रोजी इंदिरा गांधी यांनी ``20 कलमी`` कार्यक्रम जाहिर केला. त्यांनी समाजवादी व कल्याणकारी धोरण स्विकारून उत्तमप्रकारे राज्यकारभार केला.

1977 ते 1980 या काळात इंदिरा गांधींनी विरोधी पक्षाचे नेतृत्त्व स्विकारले. त्यांनी 1975 साली आणीबाणी लादल्यामुळे त्यांना 1977 ते 80 या काळात सत्तेपासून वंचित रहावे लागले. 1980 च्या लोकसभेच्या निवडणुकीत इंदिरा गांधीनी बहुमत सिद्ध करून पुन्हा केंद्रसत्ता हस्तगत केली. समाजवादी धोरण स्विकारून कल्याणकारी राज्याचे उद्दिष्ट गाठण्याचा त्यांनी प्रयत्न केला. 1980 ते 1984 या काळात लोकसभेतील काँग्रेस पक्षाच्या नेत्या होत्या. पंतप्रधान म्हणून त्यांचा हा कार्यकाल प्रभावी व महत्त्वाचा ठरला.

1980 साली त्या सत्तेवर आल्यानंतर त्यांनी राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने महत्त्वाचे कार्य केले. त्यांनी राष्ट्रीय एकात्मता मंडळाचे पुनरूज्जीवन करून राष्ट्रीय एकात्मता मंडळात सर्व घटकराज्यांचे मुखमंत्री, विविध पक्षाचे नेते, विविध आयोगाचे प्रमुख, उद्योगधंद्याचे प्रमुख यांचा समावेश केला. संसदेतील त्यांची अत्यंत महत्त्वाची कामगिरी म्हणजे 1976 साली 42 वी घटनादुरुस्ती करून त्यांनी राज्यकारभारात आमुलाग्र बदल घडवून आणले, या दुरूस्तीमुळे भारताच्या पंतप्रधानाचे स्थान अधिक शक्तिशाली व स्थिर बनले आणि राष्ट्रपतीचे स्थान नामधारी बनले. राष्ट्रपतीला पंतप्रधानाचा सल्ला मान्य करावा लागेल अशी तरतूद करण्यात आली. भारताची अखंडता आणि एकात्मता टिकविण्यासाठी त्यांनी खलिस्तान निर्मितीच्या प्रवृत्तीला प्रखरपणे विरोध केला. 31 ऑक्टोबर 1984 रोजी शीख अतिरेक्याकडून त्यांची हत्या झाली.

**6. श्रीमती गीता मुखर्जी -**

श्रीमती गीता मुखर्जी यांचा जन्म 8 जाने 1924 रोजी कलकत्ता येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए. पर्यंत असून त्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत काँग्रेसच्या स्वंयसेविका म्हणून काम केले. 1939 साली त्या भारतीय साम्यवादी पक्षात गेल्या. 1967 ते 1977 या काळात त्या पं.बंगाल विधानसभेच्या सदस्या होत्या. 1980 पासून त्या लोकसभेच्या सदस्या आहेत. बंगालच्या भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या त्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या सदस्या आहेत. तसेच अखिल भारतीय किसान सभा समितीच्या त्या सदस्या असून त्यांनी निरक्षरता, बेकारी या संदर्भात स्त्रियांच्या समस्या सोडविण्याबाबत सामाजिक कार्य केले आहे. त्यांचे लोकसभेतील योगदान मोठे आहे. मुलांचे शिक्षण, सुरक्षा व संगोपन यासंबंधीचे विधेयक, हिंदू विवाह कायदा दुरूस्ती विधेयक, लष्करी कायदा दुरूस्ती-विधेयक इत्यादी विधेयके श्रीमती गीता मुखर्जी यांनी लोकसभेत मांडली. भारतीय कम्युनिस्ट पक्षांच्या एक प्रभावी खासदार म्हणून त्यांचा लोकसभेच्या चर्चेतील सहभाग उल्लेखनीय वाटतो.

**7. श्रीमती विजयाराजे शिंदे -**

श्रीमती विजयाराजे शिंदे यांचा जन्म 12 ऑक्टोबर 1919 रोजी मध्यप्रदेशात सागर येथे झाला. त्यांचे शिक्षण वाराणसी आणि लखनौ येथे झाले. ग्वाल्हेरच्या कन्या विद्यालयाच्या तसेच त्या माधव तांत्रिक शिक्षण संस्थेच्या त्या अध्यक्षा आहेत. सागर विश्वविद्यालयाच्या त्या कुलपती होत्या. अखिल भारतीय महिला परिषदेच्या त्या दोन वेळा उपाध्यक्षा होत्या. तसेच त्या महिला परिषदेच्या ग्वाल्हेर शाखेच्या अध्यक्ष आहेत. काँग्रेस पक्षाच्या वतीने गुणा मतदारसंघातून 1957 साली त्या लोकसभेवर निवडून गेल्या. पुढे त्यांनी काँग्रेस पक्षाचा राजीनामा देऊन 1962 साली त्या संयुक्त विधायक दलामार्फत लोकसभेत निवडून आल्या. त्यानंतर 1971, 1989, 1991, 1996 व 1998 च्या लोकसभेच्या निवडणुकांत त्या निवडून आल्या. भारतीय जनता पक्षाच्या एक संघटक व प्रभावी प्रतिनिधी म्हणून त्यांचे कार्य महत्त्वाचे आहे.

**8. श्रीमती बसवराजेश्वरी -**

1928 साली श्रीमती बसवराजेश्वरी यांचा जन्म कर्नाटक मधील बेल्लारी जिल्ह्यात रायदुर्ग येथे झाला. 1957 ते 1972 या काळात त्या कर्नाटक विधानसभेच्या सदस्या होत्या. 1976 साली

विधानपरिषदेवर त्यांची निवड झाली. 1984, 1989 व 1991 साली झालेल्या लोकसभांच्या निवडणुकांत त्या काँग्रेस पक्षातर्फे निवडून आल्या. 1980 साली त्या कर्नाटक विधानसभेच्या अध्यक्षा होत्या. त्या भारत कृषक समाजाच्या उपाध्यक्षा होत्या. तसेच त्यांनी परदेशातील परिषदांसाठी भारताचे प्रतिनिधीत्व केले. श्रीमती बसवराजेश्वरी पंतप्रधानाच्या सचिवालयाच्या राज्यमंत्री होत्या. त्यांनी लोकसभेत सक्रीय सहभाग घेतला होता. सक्तीचे तांत्रिक शिक्षण व प्रशिक्षण यासंबंधीचे विधेयक, बालगुन्हेगारी संबंधीचे विधेयक, विवाह कायदा दुरूस्ती विधेयक, भिक्षा निर्मुलन विधेयक अशी विधेयके त्यांनी लोकसभेत मांडली. काँग्रेस पक्षाच्या एक खंद्या कार्यकर्त्या म्हणून त्यांचा नावलौकिक आहे.

**9. <u>श्रीमती रेणू चक्रवर्ती</u> -**

प. बंगाल मधील बसिरहत या मतदार संघातून श्रीमती रेणू चक्रवर्ती 1952, 1957 आणि 1962 साली लोकसभेवर तीन वेळा निवडून गेल्या. त्यांनी लोकसभेत साठेबाजीला प्रतिबंध करण्यासंबंधीचे विधेयक मांडले. तसेच जीवनावश्यक वस्तूंच्या पुर्ततेसंबंधी आणि समान कामासाठी समान वेतन ही विधेयके लोकसभेत मांडली. स्त्रियांच्या सामाजिक सुधारणेबाबत त्यांची आग्रही भूमिका होती. 1958 साली त्यानी लोकसभेत हुंडाप्रतिबंधक विधेयक मांडले.

**10. <u>श्रीमती शारदा मुखर्जी</u> -**

श्रीमती शारदा मुखर्जी या 1962 आणि 1967 साली लोकसभेवर महाराष्ट्रातील रत्नागिरी मतदारसंघातून निवडून आल्या. नागरी संपत्तीचे मर्यादिकरण हे विधेयक त्यांनी लोकसभेत मांडले. वेळोवेळी त्यांनी घेतलेला लोकसभेतील चर्चेतील सहभागावरून त्यांच्या स्वभावातील परखडपणा आणि स्पष्टपणा समजून येतो.

**11. <u>श्रीमती नंदिनी सत्पथी</u> -**

श्रीमती नंदिनी सत्पथी यांचा जन्म 9 जून 1931 रोजी कटक (ओरिसा) येथे झाला. त्यांचे शिक्षण एम. ए. पर्यंत झालेले आहे. 1962 ते 1972 या काळात त्या राज्यसभेच्या सदस्या होत्या. 1966 ते 1969 मध्ये त्या भारतसरकारच्या माहिती व प्रसारण खात्याच्या उपमंत्री होत्या. 1969-76 मध्ये त्या काँग्रेस कार्यकारी समितीच्या सदस्या होत्या. तसेच त्या स्टेट रेडक्रॉसच्या सदस्या आहेत. 1971 साली इंदिरा

गांधीच्या मंत्रिमंडळात त्या माहिती व प्रसारण खात्याच्या राज्यमंत्री होत्या. 1972 ते 77 या काळात त्या ओरिसा राज्याच्या मुख्यमंत्री होत्या. राष्ट्रीय युवा नारी समितीच्या आणि बाल चित्रपट समितीच्या त्या सदस्या होत्या.

**12. डॉ. सरोजिनी महेषी -**

डॉ. सरोजिनी महिषी यांचा जन्म 3 मार्च 1927 रोजी कर्नाटक राज्यातील धारवार जिल्ह्यातील रामनगर येथे झाला. त्यांचे शिक्षण एम. ए., एल् . एल. बी. , पी. एच. डी. असे आहे. त्या शिक्षण काळात त्यांना फेलोशिप मिळाली होती. सुरूवातीला विलिंग्डन महाविद्यालयात अधिव्याख्या होता, तसेच कर्नाटक विद्यापीठात सहा वर्षे कायद्याच्या प्राध्यापिका होत्या. काही काळ त्यांनी पत्रकार म्हणूनही कार्य केले. धारवार मतदार संघातून कॉंग्रेस पक्षाच्या प्रतिनिधी म्हणून 1962 ते 1969 या काळात यांची लोकसभेवर निवड झाली होती. 1967 ते 1969 मध्ये त्या पंतप्रधानांच्या संसदीय सचिव होत्या. 1971 ते 1974 मध्ये त्या पर्यटन आणि विमानसेवा या खात्याच्या उपमंत्री होत्या. तर 1974 ते 76 या काळात कायदा, न्याय या खात्याच्या उपमंत्री होत्या. [34]

काही काळ त्यानी रेल्वे विभागीय समितीच्या सदस्या म्हणून काम केले. तसेच त्या मध्यवर्ती समाजशिक्षण मंडळाच्या सदस्या व राज्यकल्याण मंडळाच्या सदस्या होत्या. कन्नड आणि हिंदी साहित्यात त्यांची पंधरा पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. डॉ. सरोजिनी महिषी यांना कर्नाटक राज्य साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाले. बेल्लारी येथे झालेल्या कर्नाटक साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झालेली होती. तसेच 1959 साली धारवार येथे झालेल्या 13 व्या म्हैसूर स्त्री परिषदेच्या त्या सचिव होत्या. 1960 साली झालेल्या 39 व्या कन्नड साहित्य संमेलनात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. प्रामुख्याने स्त्री शिक्षण आणि बालकल्याण यामध्ये त्या अधिक कार्यशील राहिल्या. धारवार जिल्हा महिला संघाच्या अध्यक्षा आणि धारवार वनिता सेवा समाजाच्या उपाध्यक्षा म्हणून त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. [35]

**संसदेतील कार्य -**

19 नोव्हेंबर 1965 रोजी डॉ. सरोजिनी महेषी यांनी घटना दुरूस्ती विधेयक (नं. 73)

लोकसभेत मांडले. काश्मिर हा भारताच्या अविभाज्य भाग असल्यामुळे भारतीय नागरिकांत कोणताही भेदभाव करता कामा नये. तेव्हा कलम 13, 19 व 35 (अ) या कलमांचा कोणत्याही प्रकारे मुलभूत हक्कांच्या संदर्भात भंग होता कामा नये. या उद्देशाने हे घटनादुरूस्ती विधेयक मांडण्यात आले. [36]

**13. श्रीमती सुशीला शंकर अडिवरेकर -**

20 जून 1923 रोजी मुंबई येथे सुशीला शंकर अडिवरेकर यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण एम् . ए. पर्यंत झालेले होते. त्या काँग्रेस सेवा दलाच्या सदस्या तसेच काँग्रेस महिला विभागाच्या अध्यक्षा होत्या. त्या श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठाच्या सिनेट सदस्या आणि सरदार वल्लभभाई पटेल विद्यापीठाच्या सिंडीकेट सदस्या होत्या. मुंबई काँग्रेसच्या तसेच अ. भा. महिला परिषदेच्या त्या सन्माननीय खजिनदार होत्या. तसेच चेतना कॉमर्स इन्सिस्टीट्युटच्या उपाध्यक्षा होत्या. [37]

**संसदेतील कार्य -**

श्रीमती सुशीला आडिवरेकर यांची राज्यसभेत महिला प्रतिनिधी म्हणून काँग्रेस पक्षातून निवड झाली होती. 1973 ते 1984 या काळातील त्यांचे राज्यसभेतील कार्य उल्लेखनीय आहे.

14. **श्रीमती उषा प्रकाश चौधरी**

26 फेब्रूवारी 1942 रोजी उषा प्रकाश चौधरी यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण एम. ए. एम. एड झाले असून त्यांनी अमरावती येथे 1975- 76 मध्ये प्राध्यापक म्हणून काम केले. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस महिला विभागाच्या संघटक (1978), जिल्हा नागरी सहकारी बँकेच्या अध्यक्षा (1976) तसेच प्रौढ शिक्षण मंडळाच्या सदस्या, शहर वाचनालयाच्या सदस्या अशा विविध भूमिका त्यांनी बजावल्या. श्रीमती उषा प्रकाश चौधरी तळमळीच्या सामाजिक कार्यकर्त्या विशेषत: मागासवर्गीय समाजाच्या कार्यकर्त्या म्हणून प्रसिद्ध आहेत. 1987 साली महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीच्या त्या सचिव होत्या.

**संसदेतील कार्य -**

शतकानुशतके चालत आलेल्या देवदासी व मुरळी या अनिष्ट प्रथा नष्ट होण्यासंदर्भातील

SHIV

विधेयक (नं. 61) श्रीमती उषा प्रकाश चौधरी यांनी लोकसभेत 30 एप्रिल 1982 रोजी मांडले. [38] 1987 मध्ये श्रीमती उषा चौधरी यांनी इंडियन मेडीसीन सेंन्ट्रल कौन्सिल अॅक्ट, 1970 मध्ये दुरूस्ती संबंधीचे विधेयक (नं. 28) लोकसभेत मांडले. [39]

**15. श्रीमती सुशीला रोहटगी**

21 ऑगस्ट 1921 रोजी अलाहाबाद येथे श्रीमती सुशीला रोहटगी यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण एम. ए. असून 1945-46 मध्ये त्या अलाहाबाद विद्यापीठात महिला विभागाच्या इतिहास विषयाच्या अधिव्याख्याता होत्या. 1962 ते 1977 या काळात त्या लोकसभेच्या सदस्या होत्या. 1971 ते 1977 या काळात सुशीला रोहटगी या भारत सरकारच्या अर्थखात्याच्या उपमंत्री होत्या. 1985 ते 1986 या काळात त्या शिक्षण आणि सांस्कृतिक विभागाच्या राज्यमंत्री होत्या. 1980 ते 1985 या काळात त्या केंद्रीय समाजकल्याण मंडळाच्या अध्यक्षा होत्या. 1958 मध्ये कोलोंबो येथे भरलेल्या आफ्रो-आशियन महिला परिषदेला त्या हजर होत्या. 1973 साली दार-ए -सलम येथे राष्ट्रकुल अर्थमंत्र्याच्या परिषदेला त्यांनी भारताचे प्रतिनिधीत्व केले होते. अखिल भारतीय महिला परिषदेच्या उत्तर प्रदेश विभागाच्या त्या माजी सचिव होत्या.

**संसदेतील कार्य -**

1973 साली श्रीमती सुशीला रोहटगी यांनी भारताच्या आकस्मिक निधी भारतीय कायद्यात दुरूस्ती करण्यासंदर्भातील विधेयक (नं. 69) लोकसभेत मांडले. 1950 च्या आकस्मिक निधी भारतीय कायद्यात दुरूस्ती करण्यासंदर्भात हे विधेयक होते. त्याचवर्षी त्यांनी युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया अॅक्ट 1963 मध्ये दुरूस्ती करण्यासंबंधीचे विधेयक लोकसभेत मांडले. 1984 मध्ये विद्यापीठ अनुदान मंडळ कायदा 1956 मध्ये दुरूस्ती करण्यासंबंधीचे विधेयक (नं. 5) लोकसभेत मांडले. 1974 साली श्रीमती रोहटगी यांनी संचित निधी संबंधीचे विधेयक (नं. 109) लोकसभेत मांडले. 1974 ते 1976या काळात त्यांनी संचित निधी संदर्भात आणखी काही विधेयके मांडली आणि ती लोकसभेने मंजूर केली.

**16. डॉ. श्रीमती राजेंद्रकुमारी वाजपेयी -**

8 फेब्रूवारी 1925 रोजी बिहार राज्यातील भागलपूर जिल्ह्यात लालूछक येथे डॉ. राजेंद्रकुमारी वाजपेयी यांचा जन्म झाला. त्याचे शिक्षण एम. ए. पी. एच. डी झाले. 1942 च्या चलेजाव

चळवळीत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. 1962 ते 1967 या काळात त्या उत्तरप्रदेश विधानसभेच्या सदस्य होत्या. 1970 ते 1977 या काळात त्या उत्तरप्रदेश सरकारच्या मंत्रीमंडळात शिक्षणमंत्री, आरोग्यमंत्री, अन्न व नागरी पुरवठा मंत्री, वीज आणि मजूर मंत्री अशा पदावर होत्या. 1971-72 या काळात उत्तरप्रदेश काँग्रेस कमिटीच्या त्या अध्यक्षा होत्या. 1980 ते 84 या कालखंडात त्या लोकसभेत होत्या. 1972-73 मध्ये सांप्रदायिक भारतीय काँग्रेस कमिटीच्या त्या जनरल सेक्रेटरी होत्या.

**संसदेतील कार्य -**

बालगुन्हेगारांचे संरक्षण, संगोपन, विकास आणि पुर्नवसन यासंबंधीचे विधेयक (नं. 130) श्रीमती राजेंद्रकुमारी वाजपेयी यांनी 1978 साली लोकसभेत मांडले. हे विधेयक लोकसभेने पास केले. [40] श्रीमती वाजपेयी यांनी 1987 साली अनूसुचित जाती जमाती संबंधीचे विधेयक (नं. 104) लोकसभेत मांडले. [41]

**17. डॉ. श्रीमती सुशीला नायर -**

श्रीमती सुशीला नायर यांचा जन्म 26 डिसेंबर 1914 रोजी कुंजगावी येथे झाला. त्यांचे शिक्षण एम. बी. बी. एस. एम. डी. झाले असून त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. महात्मा गांधी आणि कस्तुरबा गांधी यांच्या समवेत 1942-44 या दरम्यान तुरुंगवास भोगला. सेवाग्राम येथील महात्मा गांधी मेडिकल सायन्सेस मधील सामाजिक व वैद्यकीय विभागात त्यांनी मानद प्राध्यापक म्हणून काम केले. 1955 ते 72 या काळात त्या कस्तुरबा गांधी नॅशनल मेमोरियल ट्रस्टच्या त्या अध्यक्षा होत्या. 1952 ते 56 या काळात त्या दिल्ली राज्य विधानसभेच्या सदस्या होत्या. 1952 ते 55 च्या दरम्यान डॉ. सुशीला नायर दिल्ली स्टेट गव्हर्नमेंट मध्ये आरोग्य पुनर्वसन व वाहतूक खात्याच्या मंत्री होत्या. 1955-56 मध्ये त्या दिल्ली स्टेट असेंम्बलीच्या सभापती होत्या. 1962 ते 67 या काळात त्या केंद्रसरकारच्या त्या आरोग्यमंत्री होत्या. 1964 ते 1967 या काळात इंडियन रेडकोर्स सोसायटीच्या त्या अध्यक्षा होत्या. 1962 साली त्यांना वाङमय पुरस्कार मिळाला. `हमारी माँ कस्तुरबा` व `कारावास की कहानी` ही त्यांची दोन पुस्तके प्रकाशित झाली होती.

**संसदेतील कार्य -**

विदेशात संपत्ती ठेवणाऱ्या भारतीय लोकासंबंधीचे विधेयक, संपत्ती करा विषयीचे

विधेयक, कामगारांच्या निवासासंबंधीचे विधेयक, परिचारिका मंडळ दुरूस्ती विधेयक अशी विधेयके डॉ. सुशीला नायर यांनी लोकसभेत 1957 साली मांडली.

**18. श्रीमती शीला कौल -**

उत्तरप्रदेश राज्यात लखनौ येथे 1916 साली श्रीमती शीला कौल यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण बी. ए. बी. टी. झाले होते. 1968 ते 70 या काळात त्या उत्तरप्रदेश विधानसभेच्या सदस्य होत्या. 1971 साली त्या लोकसभेवर निवडून आल्या. 1980 ते 84 या काळात त्या भारत सरकारच्या शिक्षण, सांस्कृतिक सामाजिक कल्याण खात्याच्या राज्यमंत्री होत्या. आखिल भारतीय महिला परिषदेच्या लखनौ शाखेच्या त्या सदस्य होत्या.

**संसदेतील कार्य -**

श्रीमती शीला कौल यांनी दिल्ली विद्यापीठाचे दुरूस्ती विधेयक (नं. 99) हे लोकसभेत 20 ऑगस्ट 1981 रोजी लोकसभेत मांडले. हे विधेयक मंजूर होवून दिल्ली विद्यापीठ कायद्यात दुरूस्ती करण्यात आली. [42] 24 ऑगस्ञ 1983 रोजी शीला कौल यांनी दि कॉपीराईट ॲक्ट 1957 मध्ये दुरूस्ती करण्यासंबंधीचे विधेयक लोकसभेत मांडले. [43] 1982 मध्ये त्यानी बनारस हिंदू विद्यापीठ कायदा अलिगढ मुस्लिम विद्यापीठ कायदा 1920 दिल्ली विद्यापीठ कायदा 1922, विश्वभारती कायदा 1951, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ कायदा 1966, उत्तरपूर्व डोंगरी विद्यापीठ कायदा 1973, हैद्राबाद विद्यापीठ कायदा 1974 अशा विविध विद्यापीठाच्या कायद्यातून दुरूस्ती करण्यासंबंधी विधेयक लोकसभेत मांडले. [44]

**19. तारकेश्वरी सिन्हा -**

बिहार राज्यात पाटणा येथे 29 डिसेंबर 1926 रोजी तारकेश्वरी सिन्हा यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण एम. ए. पर्यंत झाले असून पाटणा जिल्हा बोर्डाच्या त्या सदस्या होत्या. 1952 ते 1970 या काळात त्या लोकसभेच्या सदस्या होत्या. 1958 ते 66 या काळात त्या भारत सरकारच्या अर्थखात्याच्या उपमंत्री होत्या.

**संसदेतील कार्य -**

1952 साली तारकेश्वरी सिन्हा यांनी महाराष्ट्रातील दुष्काळाची स्थिती लोकसभा या गृहात मांडली. तसेच भारत-पाकिस्तान देशाच्या दरम्यान स्त्रियांना पळवून नेले जाते आणि त्याबातची कायदा व

यंत्रणा योग्यप्रकारे कार्यरत नसल्याची खंत त्यांनी लोकसभेत प्रकट केली. तसेच परराष्ट्रधोरण विषयक आपले मत व्यक्त केले. परराष्ट्रधोरण अधिक विस्तृत व गुंतागुंतीचे आहे हे सांगून आणि व्यावसायिक शिक्षणसंबंधी असमाधान व्यक्त करून मुलांचे व स्त्रियांचे शिक्षण कसे महत्त्वाचे आहे आणि त्यासाठी शासनाने अनुदान दिले पाहिजे, याविषयी त्यानी विचार लोकसभेत मांडले. अंध, मुक-बधिर मुलांच्यासाठी शिक्षणसंस्था स्थापन केल्या पाहिजेत असेही त्यांनी लोकसभेत मत व्यक्त केले.

**20. <u>बिभा घोष</u> -**

पश्चिम बंगाल राज्यात नाडिया जिल्ह्यात बडकुल्ल येथे 1934 साली श्रीमती बिभा घोष गोस्वामी यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण बी. ए. बी. टी. असून त्या सामाजिक व राजकीय कार्यकर्त्या आहेत. पश्चिम बंगालमधील अखिल बंगाल शिक्षक संघाच्या तसेच गणतांत्रिक महिला समितीच्या त्या सदस्या होत्या. 1971 साली त्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षामार्फत लोकसभेत निवडून आल्या.

**<u>संसदेतील कार्य -</u>**

भारतीय उद्योगधंदे आणि कामगार यासंबंधीचे विधयेक (नं. 37) 15 मार्च 1985 रोजी बिभा घोष यांनी लोकसभेत मांडले. विविध उद्योगधंदे आणि आस्थापनामधील स्त्री कामगारांच्या कल्याणविषयीचे हे विधेयक होते.

**21. <u>श्रीमती सुभद्रा जोशी</u> -**

श्रीमती सुभद्रा जोशी यांचा जन्म 1919 साली झाला. त्यांचे शिक्षण एम. ए. पर्यंत असून त्या समाजसुधारक व राजकीय कार्यकर्त्या होत्या. 1952 ते 1967 या काळात त्या लोकसभेच्या प्रतिनिधी होत्या. दिल्लीच्या चांदणीचौक मतदारसंघातून लोकसभेच्या पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या निवडणुकीत काँग्रेस पक्षातून त्या विजयी झाल्या. [45]

**<u>संसदेतील कार्य -</u>**

फौजदारी गुन्हेगारी कायदा निर्मितीचे हे विधेयक (नं. 90) सुभद्रा जोशी यांनी लोकसभेत 19 डिसेंबर 1957 रोजी मांडले. संसदेच्या मान्यतेनंतर या विधेयकाचे राष्ट्रपतीच्या सहीने 16 सप्टेंबर 1959 रोजी कायद्यात रूपांतर झाले. [46] प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेच्या विधेयकाच्या चर्चेत सुभद्रा जोशी यांनी 21 जुलै 1952 रोजी लोकसभेच्या चर्चेत भाग घेतला होता.

22. <u>डॉ. श्रीमती नजमा हेपतुल्ला -</u>

श्रीमती नजमा हेपतुल्ला यांचा जन्म 13 एप्रिल 1940 रोजी भोपाळ येथे झाला. या प्राणीशास्त्रात एम. एस्सी. पीएच. डी. झालेल्या आहेत. त्यांना ज्युनियर रिसर्च फेलोशिप व सिनियर रिसर्च फेलोशिप मिळालेली होती. मुंबई प्रदेश कॉंग्रेस समितीच्या सचिव, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीच्या सदस्या, अखिल भारतीय हाज सल्लागार मंडळाच्या सदस्या अशा भूमिका त्यांनी पार पाडल्या. 1985 पासून या राज्यसभेच्या खासदार असून 1986 पासून त्या राज्यसभेच्या उपसभापती पदावर आहेत. 1986 पासून त्या अखिल भारतीय कॉंग्रेस समितीच्या सचिवपदी आहेत. तसेच त्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय महिला परिषदांमध्ये अध्यक्षपद भूषविले आहे. 1995 साली चीनमध्ये झालेल्या बिजिंग आंतरराष्ट्रीय महिला परिषदेमध्ये नजमा हेपतुल्ला यानी भारताचे प्रतिनिधीत्व केले.

<u>संसदेतील कार्य -</u>

नजमा हेपतुल्ला यांनी 1983 साली राज्यसभेत दिल्ली भाडे नियंत्रण कायद्यात सुधारणा करण्यासाठी विधेयक (नं. 7) मांडले.

भारताचे उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. त्यामुळे राज्यसभेच्या संपूर्ण कामकाजाची जबाबदारी उपसभापतीवर पडलेली असते. डॉ. श्रीमती नजमा हेपतुल्ला यांनी ही जबाबदारी उत्तमप्रकारे पार पाडलेली आहे. त्यांचे उपसभापती म्हणून राजयसभेतील योगदान उल्लेखनीय व कौतुकास्पद आहे.

23. <u>श्रीमती गंगादेवी -</u>

श्रीमती गंगादेवी यांचा जन्म 1916 साली उत्तरप्रदेश राज्यात लखनौ येथे झाला. त्यांचे माध्यमिक शिक्षण डेहराडून येथे झाले, तर महाविद्यालयीन शिक्षण बनारस हिंदू विद्यापीठात झाले. त्या सामाजिक व राजकीय कार्यकर्त्या होत्या. 1952- 54 मध्ये त्या अनुसूचित जाती जमाती आणि इतर मागासवर्गीय जातीच्या स्कॉलरशिप बोर्डाच्या सदस्या होत्या. त्या 1958 ते 1960 मध्ये मध्यवर्ती समाजकल्याण मंडळाच्या सदस्या होत्या. जिल्हा कॉंग्रेस कमिटी, लखनौच्या सदस्या, तसेच 1950 ते 1953 मध्ये पोस्ट आणि टेलीग्राम कर्मचारी संघ, मीरतच्या अध्यक्षा होत्या. अखिल भारतीय वर्गिकृत जाती- उन्नती संघांच्या अध्यक्षा, तसेच 1972 ते 1971 मध्ये अखिल भारतीय मागासलेल्या वर्गाच्या

संघटनेच्या त्या अध्यक्षा होत्या. 1963-64 मध्ये त्या अंदाजपत्रक समितीमध्ये सदस्या होत्या. 1962 ते 64 मध्ये आणि 1967 मध्ये श्रीमती गंगादेवी संसदेतील काँग्रेस पक्षाच्या कार्यकारी समितीच्या सदस्या होत्या. ग्रामीण भागातील मागासवर्गीय जातीच्या कल्याणासाठी मुलांच्या शिक्षणासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. बालविवाह, जातीव्यवस्था अशा वाईट प्रथांच्या निर्मुलनासाठी त्यांनी प्रयत्न केले. 1971 साली त्या मोहनालाल गंज या मतदारसंघातून काँग्रेस पक्षाच्या तिकिटावर निवडून आल्या.

<u>संसदेतील कार्य</u> -

श्रीमती गंगादेवी यांनी लोकसभेत 18 डिसेंबर 1952 रोजी चर्चेत भाग घेऊन भारताच्या नियोजनातील उणीवा स्पष्ट केल्या. स्त्रीशिक्षण, अस्पृश्यता निवारण, मागासवर्गियांची निवासस्थाने, परदेशी शिष्यवृत्या इ. गोष्टीचा अभाव नियोजनात पूर्णपणे दिसून येतो, तेव्हा नियोजनात या गोष्टीचा प्रामुख्याने विचार करणे आवश्यक आहे. असे स्पष्ट मत त्यानी लोकसभेत मांडले.

**24. <u>श्रीमती मार्गारेट अल्वा</u> -**

श्रीमती मार्गारेट अल्वा यांना जन्म 14 एप्रिल 1942 रोजी मंगलोर येथे झाला. त्यांचे शिक्षण बी. ए. बी. एल. झालेले आहे. 1972-73 मध्ये त्या काँग्रेस महिल्या आघाडीच्या राज्यनिमंत्रक होत्या. 1975-76 मध्ये काँग्रेस पक्षाच्या स्थायी समितीच्या आणि माहिती व प्रसारण समितीच्या निमंत्रक होत्या. 1978-80 मध्ये कर्नाटक प्रदेश काँग्रेस समितीच्या त्या सचिव होत्या. 1975 साली मेक्सिको येथे भरलेल्या युनो परिषदेमध्ये आणि 1976 साली युनोच्या आमसभेत त्यानी भारताचे प्रतिनिधित्व केले. 1974 ते 86 या काळात त्या राज्यसभेवर निवडून आल्या. 1985 साली त्या भारत सरकारच्या संसदीय कामकाज खात्याच्या राज्यमंत्री झाल्या. 1975 ते 76 या काळात महिला वकिल संघटना, राष्ट्रीय बालमंडळ, राष्ट्रीय प्रौढ शिक्षण मंडळ, केंद्रीय युवा सल्लागार मंडळ, जागतिक महिला संसदीय शांतता समिती अशा विविध मंडळांच्या त्या सदस्या होत्या.

<u>संसदेतील कार्य</u> -

श्रीमती मार्गारेट अल्वा यांनी 13 मार्च 1979 रोजी राज्यसभेतील चर्चेत भाग घेवून बिहारमधील ख्रिश्चन समाजाला कोणत्याही प्रकारची सुरक्षितता नाही आणि तेथील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे कोसळलेली आहे, तेथे कोणत्याही प्रकारची सार्वजनिक शिस्त ठेवली जात नाही असे स्पष्ट मत

मांडले.

राज्यमंत्री श्रीमती मार्गारेट अल्वा यांनी 20 ऑगस्ट 1986 रोजी राज्यसभेत जाहिराती, प्रकाशने, छायाचित्रे आणि रेखाचित्रे याद्वारे स्त्रियांचे होणारे अश्लिल प्रदर्शन थांबविण्यासंबंधीचे विधेयक मांडले. हे विधेयक राज्यसभा व लोकसभा या गृहांनी पास केले. [47]

**25. <u>श्रीमती पाटील प्रतिभा देवीसिंग</u> -**

19 डिसेंबर 1934 रोजी जळगाव येथे प्रतिभा पाटील यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण एम. ए. एल. एल. बी. झाले होते. 1962 साली त्यांनी जळगाव जिल्ह्यात महिला होमगार्डस संघटित केले. 1962 ते 1985 मध्ये त्या महाराष्ट्र विधानसभेच्या सदस्या होत्या. याकाळात सार्वजानिक आरोग्य व समाजकल्याण खाते, पुनर्वसन व सांस्कृतिक खाते, नागरी पुरवठा आणि समाजकल्याण खाते अशा विविध खात्याच्या त्या कॅबिनेट मंत्री होत्या. राज्यसभेत त्या उपसभापती होत्या. भारतीय ग्रामीण महिला संघाच्या त्या महाराष्ट्राच्या अध्यक्षा होत्या. स्थायी समिती, अखिलभारतीय महिला परिषदेच्या त्या सदस्या होत्या. दिल्ली येथे भरलेल्या महिला परिषदेच्या त्या निमंत्रक होत्या. परदेशातील विविध परिषदांना त्यांनी उपस्थित राहून भारताचे प्रतिनिधीत्व केले.

**26. <u>श्रीमती सरोज खापर्डे</u> -**

श्रीमती सरोज खापर्डे यांचा जन्म 15 ऑगस्ट 1941 रोजी मुंबई येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए. पर्यंत झालेले होते. त्या कॉंग्रेस (आय) पक्षाच्या होत्या. त्या महाराष्ट्र कॉंग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षा होत्या. 1972, 1976, 1982, 1988 साली राज्यसभेवर चार वेळा निवडून गेल्या. 1972 मध्ये बर्लिन व 1981 मध्ये कोपेनहेगन मध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदनां त्या हजर राहिल्या. 1986 ते 1988 मध्ये त्या आरोग्य आणि कुटुंबकल्याण राज्यमंत्री होत्या. 1989-90 मध्ये त्यानी संसदेच्या विविध समित्यांवर काम केले.

**27. <u>श्रीमती जयंती नटराजन</u> -**

श्रीमती जंयती नटराजन यांचा जन्म 7 जून 1954रोजी मद्रास येथे झाला. त्यांचे शिक्षण बी. ए. बी. एल. झाले होते. त्यांनी अखिल भारतीय महिला परिषदेमध्ये कार्य केले. त्यानी गरीबांना कायदेविषयक मोफत सल्ला दिला. 1986 मध्ये त्या राज्यसभेवर निवडून आल्या. जयंती नटराजन

मध्यवर्ती समाज कल्याण मंडळाच्या सदस्या होत्या.

**28. श्रीमती प्रमिलाताई चव्हाण -**

श्रीमती प्रमिलाताई चव्हाण यांचा जन्म 2 जुलै 1918 साली गुजराथमध्ये बडोदा येथे झाला. सुरवातीला त्या शेतकरी कामगार पक्षाच्या सदस्य होत्या. 1973 ते 1979 पर्यंत त्या लोकसभेच्या सदस्या होत्या. 1981 ते 1984 या काळात त्या राज्यसभेच्या सदस्य होत्या. त्या महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अध्यक्ष होत्या. अखिल भारतीय महिला क्रिकेटच्या त्या अध्यक्षा होत्या.

**29. श्रीमती अनसुया काळे -**

श्रीमती अनसूया बाई काळे या महाराष्ट्र राज्यातील असून त्या विदर्भ मतदार संघातून निवडून आल्या त्या पहिल्या व दुसऱ्या लोकसभा निवडणुकीत निवडून आल्या होत्या. अनुसया काळे या अत्यंत -बुद्धीमान, चिकित्सक व अभ्यासू होत्या त्यानी लोकसभेत महागाई, रोजगार, कुटुंब नियोजन, विडी कामगार, दिल्लीमधील खोल्या शिक्षणसंस्था यासारख्या विषयावर अनेक प्रश्न विचारले. त्यांनी प्रामुख्याने आरोग्य या विषयावर लोकसभेत अनेक प्रश्न उपस्थित केले होते. त्यांनी अनेक विधेयकाच्या चर्चेत भाग घेतला. जातीयता निर्मुलन विधेयक, हुंडाबंदी विधेयक इ. [48]

**30. श्रीमती ताराबाई सप्रे -**

ताराबाई सप्रे या महाराष्ट्र घटक राज्यातील असून 1967 ते 1971 या काळात लोकसभेमध्ये होत्या. ताराबाई सप्रे यांचे लोकसभेतील कार्य पाहिले तर ते नक्कीच नोंद घेण्यासारखे आहे. सिमेंटच्या किंमती, बालकांची चित्रपट संस्था, ताश्कंद करार, कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमात होमोओपॅथिचा उपयोग, रशियाकडून भारताला साहाय्य असे अनेक उपप्रश्न त्यांनी लोकसभेत उपस्थित केले. नर्मदा पाणीतंटा, न्यायाधीशांच्या नोकरीच्या अटी इ. चर्चेत त्या सहभागी झाल्या. [49]

**31. श्रीमती रोझा देशपांडे -**

श्रीमती रोझा देशपांडे या कॉ. श्रीपाद डांगे यांची कन्या. रोझा देशपांडे या भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या आहेत. त्या महाराष्ट्र घटकराज्यातील असून त्या मुंबईच्या दादर मतदारसंघातून निवडून आल्या होत्या. लहानपणापासूनच त्यांना राजकीय, सामाजिक विषयांची ओळख झाली. लहान वयातच विद्यार्थी चळवळ, कामगार चळवळ, चर्चासत्रे, शिबीरे, यात त्या सहभागी झाल्यामुळे व कौटुंबिक राजकीय

SHIVAJI UNIVERSITY * KOL

पार्श्वभूमी लाभल्यामुळे त्यांचे राजकीय, सामाजिक विचार परिपक्व झाले व त्यामुळे त्यांचे लोकसभेतील कार्यही प्रभावी ठरले. गलिच्छ वस्ती, सूत गिरण्या, मजूर, मुंबईच्या कॅलिको केमिकल्स कंपनीतील कामगारांचा प्रश्न, बंदराचे आधुनिकीकरण, राजस्थान व मध्यप्रदेश येथे झालेली सती प्रकरणे इत्यादी प्रश्न त्यांनी लोकसभेत मांडले. [50]

**32. श्रीमती ताराबाई साठे -**

ताराबाई साठे या महाराष्ट्र घटकराज्यातील असून त्यांनी कॉंग्रेसमध्ये 1940 साली प्रवेश घेतला. त्या महाराष्ट्र विधानसभेमार्फत राज्यसभेत निवडून आल्या. त्यांनी राज्यसभेत आठ ठराव मांडले त्याचबरोबर अनेक विधेयकाच्या चर्चेत भाग घेतला.आयात निर्यात, प्रसुतीकालीन सवलती, परदेशी विवाह इ. विधेयकांच्या चर्चेत भाग घेतला. लोकप्रतिनिधी दुरूस्ती विधेयक 1966 व भारतीय दत्तक विधान विधेयक 1967 अशी दोन विधेयके त्यांनी राज्यसभेत मांडली. त्यांची निवड अध्यक्षमंडळावर झालेली होती. एकदा राज्यसभेच्या अध्यक्षांच्या गैरहजेरित ताराबाई साठेकडे राज्यसभेचे अध्यक्षपद आले तेव्हा त्यांनी अत्यंत कौशल्याने व चातुर्याने कामकाज चालविले तेव्हा त्यांच्या कार्याबद्दल सरदार बलदेवसिंग नेहरूंना उद्‌गारले ``पंडितजी, काल तुम्ही राज्यसभेत उपस्थित हवे होतात, महाराष्ट्राची दुर्गा कशी असते हे तुम्हाला पाहायला मिळाले असते.`` [51]

33. **श्रीमती शंकुतला परांजपे-**

श्रीमती शंकुतला परांजपे या महाराष्ट्र घटक राज्यातील असून त्या महाराष्ट्रातून राज्यसभेवर गेल्या. त्यांनी राज्यसभेत भारतातील कुटुंब नियोजनाबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले. कुटुंब नियोजनावरील खर्च, कुटुंब नियोजनाचा प्रचार, गर्भपाताला कायदेशीर मान्यता इत्यादी. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विषयावरही अनेक प्रश्न विचारले. त्यांनी राज्यसभेत दहा लक्षवेधी सुचनाही मांडल्या. सर्वसाधारण अर्थसंकल्प व रेल्वेअंदाजपत्रकावरही त्यांनी अनेक वेळा आपले विचार मांडले. थोडक्यात त्यांचे राज्यसभेतील कार्य नोंद घेण्यासारखे उल्लेखनीय आहे. [52]

**34. श्रीमती प्रमिला दंडवते -**

श्रीमती प्रमिला दंडवते या माजी अर्थमंत्री मधू दंडवते यांच्या पत्नी होत. मुंबई उत्तर-मध्य मतदार संघातून त्या 1977 साली लोकसभेत जनता पक्षामार्फत निवडून आल्या. 1961 च्या हुंडाप्रतिबंधक

कायद्यात दुरूस्ती सुचविणारे विधेयक, 1973 च्या फौजदारी कायद्याच्या प्रक्रियेच्या दुरूस्तीबाबतचे विधेयक, लोकप्रतिनिधीत्वाच्या कायद्यासंबंधीचे विधेयक आणि 1955 च्या हिंदू विवाह कायद्यात दुरूस्ती करण्याबाबतचे विधेयक, इत्यादी विधेयके लोकसभेपुढे त्यांनी चर्चेसाठी मांडली होती. जनता पक्षाच्या एक कर्तव्यदक्ष व निष्ठावंत कार्यकर्त्या म्हणून त्या प्रसिद्ध आहेत. तरीपण त्यांना 1979 साली जनता पक्षाच्या कार्यकारणीवर घेतले नव्हते.

**35. श्रीमती मृणाल गोरे -**

श्रीमती मृणाल गोरे या जनता पक्षातून 1977 साली मुंबई- उत्तर मतदार संघातून लोकसभेवर निवडून गेल्या. जनता पक्षाच्या कार्यकारिणीच्या त्या सदस्या आहेत. एक प्रभावी व कार्यक्षम महिला प्रतिनिधी म्हणून त्यांचे सामाजिक व राजकीय कार्य वाखणण्याजोगे आहे. महिला, पददलित आणि मध्यवर्गीयांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी वेळोवेळी मोर्चा काढणारी, आंदोलने करणारी महिला, पाणीवाली, लाटणेवाली कार्यकर्ती म्हणून त्यांनी केलेले कार्य अविस्मरणीय आहे. पुरूषांच्या बरोबरीने स्त्रियांना समान वागणूक आणि दर्जा मिळावा यासाठी त्यांचे प्रयत्न सातत्याने चालू असलेले दिसतात. सामान्य लोकांना जीवनावश्यक वस्तू वाजवी दरात सहजपणे उपलब्ध व्हाव्यात म्हणून वेळोवेळी त्या आंदोलने करताना दिसतात.

**36. श्रीमती शशिकला काकोडकर -**

श्रीमती शशिकला काकोडकर यांचा जन्म गोव्यामध्ये पेडणे गावी 9 जाने 1935 रोजी झाला. माजी मुख्यमंत्री दयानंद बांदोडकर यांच्या त्या कन्या होत. त्यांचे शिक्षण एम. ए. पर्यंत झाले असून त्यांनी गोवा मुक्ती संग्रामात भाग घेतलेला होता. गोवा विधानसभेच्या 1973 ते 79 या काळात त्या गोवा राज्याच्या मुख्यमंत्री होत्या. प्राथमिक शिक्षक संघाच्या त्या अध्यक्षा आहेत.

**37. सुमित्रा महाजन -**

12 व्या लोकसभेच्या निवडणुकीत इंदूर मतदार संघातून चौथ्यांदा निवडून येण्याचा विक्रम श्रीमती सुमित्रा महाजन यांनी केलेला आहे. सुमित्रा महाजन या मूळच्या महाराष्ट्रातील चिपळूनच्या असून त्या पूर्वाश्रमीच्या सुमित्रा साठे होत. त्यांचे वडील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कट्टर कार्यकर्ते आणि व्यवसायाने वकील होते. त्यामुळे सुमित्राताईना राजकारणाचे बाळकडू त्यांच्या वडिलांकडून

मिळाले.सुमित्राताई राष्ट्रसेविका समितीच्या कार्यकर्त्या आहेत. 1982 साली त्या इंदूर नगरपालिकेच्या नगरसेविका तर 1984 साली त्या उपमहापौरपदी निवडून आल्या. 1989 मध्ये नवव्या लोकसभेत इंदूर मतदारसंघातून निवडून त्या आल्या. आणि पुढे सतत तीन वेळा त्याच मतदारसंघातून त्या विजयी झाल्या. भारतीय जनता पक्षाच्या सरचिटणीसपदी त्यानी उत्तम कामगिरी बजाविली. सध्या त्या भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय सचिव आहेत. इंदूर मतदारसंघात काम करताना सुमित्रा ताईनी अहिल्याबाई होळकरांचाच वसा घेतलेला दिसतो. तर संसदेत काम करताना त्या झाशीच्या राणीचा अवतार घेऊन स्पष्टपणे व निभिर्डपणे बोलताना दिसतात. स्त्रियांवरील अन्यायाचे निवारण, भ्रष्टाचार निर्मूलन अशा कार्यासंबंधी त्यांचे लोकसभेतील प्रभावी व्यक्तीमत्त्व आणि वक्तृत्व झाशीच्या राणीसारखे वाटते. इंदूरमधील मराठी जनतेसाठी त्यानी सानंद नावाची संस्था काढली. मराठी भाषेच्या अस्तित्वासाठी आणि प्रसारासाठी ही संस्था कार्यरत आहे. संसदेतील त्यांचे कार्य प्रभावी व परिणामकारक असे वाटते.

**38. <u>श्रीमती सुषमा स्वराज्य</u> -**

सुषमा स्वराज्य यांचा जन्म 14 फेब्रूवारी 1952 रोजी हरयाणा राज्यात अंबाला कॅंटोमेंट येथे ब्राह्मण कुळात झाला. त्या अंबाला एस. डी. कॉलेजमधून बी. ए. आणि पंजाब विद्यापीठातून एल. एल. बी. झाल्या. काही काळ त्यांनी दिल्ली येथे वकिली केली. 1977 मध्ये त्या अंबाला कॅंट मतदारसंघातून हरयाणा विधानसभेवर निवडून गेल्या. वयाच्या 25 व्या वर्षी त्या हरयाणा सरकारमध्ये मंत्री झाल्या. 1984 मध्ये त्या जनता पक्ष सोडून भाजपमध्ये प्रवेश केला. 1987 च्या हरयाणा विधानसभेचया निवडणुकीत भाजपातून निवडून आल्या. 1990 मध्ये त्यांची राज्यसभेवर निवड झाली. भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय प्रवकत्या म्हणून त्यानी उत्तम कामगिरी बजाविली. 1996 व 1998 च्या लोकसभेच्या निवडणुकीत त्या दिल्लीतून लोकसभेवर निवडून गेल्या. 1996 च्या भाजपच्या 13 दिवसाच्या सरकारात त्या मंत्री होत्या. मार्च 1998 मध्ये वाजपेयी सरकारमध्ये त्या माहिती व नभोवाणी मंत्री बनल्या दळणवळण खात्याची जबाबदारी (बुटासिंग यांच्या राजीनाम्यांनतर) त्यांनी सांभाळली होती. 12 ऑक्टोंबर 1998 रोजी त्या दिल्ली राज्याच्या मुखमंत्री झाल्या. परंतु त्यांच्या पक्षाचा विधानसभेच्या निवडणुकीत पराभव झाल्यानंतर अवघ्या एक महिन्यातच त्यांना मुखमंत्रीपद सोडावे लागले.

**39. श्रीमती गिरिजा व्यास -**

श्रीमती गिरिजा व्यास यांचा जन्म 8 जुलै 1946 रोजी राजस्थानमधील नथलवारा येथे झाला. त्यांचे शिक्षण एम. ए. पी. एच. डी. झालेले आहे. 1967 साली त्याना विद्यापीठाचे गोल्ड मेडल मिळाले होते. 1967 ते 69 या काळात त्यांना यू. जी. सी. फेलोशिप मिळाली होती. त्यानंतर त्यांना 1979-80 मध्ये पदव्युत्तर संशोधनाची फेलोशिप मिळाली होती. त्या उदयपूर येथील सुखडिया विद्यापीठात तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापिका होत्या. अखिल भारतीय तत्त्वज्ञान संघटनेच्या त्या सदस्य होत्या. 1984 साली त्या राजस्थान विधानसभेत निवडून गेल्या. 1988 साली त्या पर्यटन, महिला आणि बालकल्याण खात्याच्या राजमंत्री होत्या. 1991 ते 96 या काळात त्या लोकसभेच्या सदस्या होत्या. 1991-92 मध्ये त्यांच्याकडे भारत सरकारचे माहिती आणि प्रसारण खात्याचे उपमंत्री पद होते.

**40. श्रीमती ममता बॅनर्जी -**

श्रीमती ममता बॅनर्जी यांचा जन्म 5 जाने 1955 रोजी कलकत्ता शहरात झाला. कलकत्ता व ईस्ट जॉर्जिया विद्यापीठातून त्यांचे शिक्षण एम. ए., पीएच. डी, बी. एड् . एल. एल. बी. झाले. त्या राजकारणात 1969 साली आल्या. 1977 ते 83 या काळात ममता बॅनर्जी प. बंगाल छात्र परिषदेच्या कार्यकारिणीच्या सदस्या होत्या. 1970 ते 80 या काळात पं. बंगाल महिला कॉंग्रेस आयच्या त्या सचिव होत्या. 1988 ते 1997 पर्यंत त्या कॉंग्रेस पक्षाच्या संसदीय सदस्या आहेत. 1990 साली त्या पं. बंगाल प्रदेश युवा कॉंग्रेसच्या अध्यक्षा झाल्या. 1984 ते 91 मध्ये त्या लोकसभेच्या सदस्या होत्या. 1991 मध्ये युवा महिला बालविकास खात्याच्या राज्यमंत्री होत्या. श्रीमती ममता बॅनर्जी यांचा विविध सामाजिक व सांस्कृतिक संस्थांशी घनिष्ठ संबंध आहे. त्या विविध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय परिषदांना हजर राहिल्या- 1998 साली ममता बॅनर्जी कॉंग्रेस पक्षातून बाहेर पडल्या व त्यांनी तृणमूल कॉंग्रेसची स्थापना केली. पुढे 12 व्या लोकसभेत त्या याच पक्षातून निवडून आल्या. महिला आरक्षण विधयेकावर लोकसभेच्या (डिसेंबर 98) हिवाळी अधिवेशनात चर्चा झाली तेव्हा ममता बॅनर्जी यांनी हे विधेयक सादर व्हावे म्हणून खूप आक्रमक व प्रभावी भूमिका घेतली. ममता बॅनर्जी व समाजवादी पक्षाचे दरोगाप्रसाद सरोज यांच्यात या विधेयकावरून लोकसभेत खूप मोठी चकमक उडाली, याचाच परिणाम लोकसभेत 14 डिसेंबर 1998 रोजी कायदामंत्री थंबीदुराई यांनी जे महिला आरक्षण विधेयक सादर केले यात ममता बॅनर्जी यांचा सिंहाचा वाटा

आहे.

आक्रमक भूमिका घेतल्याशिवाय स्त्रियांच्या मागण्या मान्य होत नाहीत हे ममता बॅनर्जी यांनी आपल्या दाखवून दिले.

अशाप्रकारे स्वातंत्र्योत्तर काळातील महिलांचा राजकीय सहभाग आणि संसदेतील कार्य यांचा आढावा घेतला असला तरीही येथे सर्व महिला सदस्यांचा समावेश करता आलेला नाही. तरीपण त्यांच्या नावांचा उल्लेख करणे उचित ठरेल. श्रीमती पद्मजा नायडू (हैद्राबाद), उमा नेहरू (उत्तर प्रदेश), जयश्री (मुंबई), शंकुतला देवी (बंका) , मणीबेन पटेल (फैस साऊथ), पार्वती कृष्णन (पंजाब), मंजुण्णदेवी (गोलपारा) , सत्यभामा देवी (जहानबाद), कुमारी एम. वेदकुमारी (एलरू), माफिदा अहमद (जोरहत), रेणुका रे (मालदा- पं. बंगाल), गायत्री देवी (जयपूर), यशोदा रेड्डी (करनुल), लक्ष्मीकांतम्मा (खम्मम), कृष्णा मेहता (जम्मू आणि कश्मिर), अक्कमादेवी (नीलग्रीस), अहिल्याबाई रांगणेकर (मुंबई उत्तर-मध्य), कृष्णा कुमारी (जोधपूर), माया रे (राणीगंज), व्ही. जयलक्ष्मी (शिवकाशी), चंद्रावती (भिवानी),मोहसिना किडवाई (मीरत) श्रीमती मोहसिना किडवाई यांनी लोकसभेत अनेक विधेयके मांडली आणि चर्चेत सक्रिय भाग घेतला. संसदपटलावर त्याचे कार्य उल्लेखनीय आहे.) कृष्णा साही (बेगसराई), विद्यापती चर्तुवेदी (खजुराहो), वैजंयतीमाला बाली (मद्रास - दक्षिण), शालिनी पाटील (सांगली), सुखबान कौर (गुरूदासपूर), किशोरी सिन्हा (वैशाली) , इंदूमती भट्टाचार्य (हुघळी), शीला दिक्षीत (अलिगढ), सीता देवी (पंजाब), मार्गार्थेम चंद्रशेखर (मद्रास 1952 ते 1967 या काळात त्या संसदेच्या सदस्या होत्या. केंद्रसरकारमध्ये त्यांनी विविध मंत्रीपदे भूषविली होती. अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीच्या त्या सचिव व खजिनदार होत्या. एक कार्यक्षम महिला मंत्री म्हणून त्यांचे कार्य प्रशंसनिय वाटते. ) उषा वर्मा खेरे (खेरी), प्रभावती गुप्ता (मोतीहारी), उषा ठक्कर (कच्छ), व्ही. राधाबाई (भद्राचलम - आंध्र), रेणुकादेवी बारकत्तकी (गोहाटी - आसाम), रशिदा हक चौधरी (आसाम), श्री अकबर जँहा बेगम (जम्मू - काश्मिर) , श्रीमती अम्मूनाथन (तामिळनाडू), कमला बहुगुणा (उत्तर प्रदेश), अन्ना मैती (पं. बंगाल), अंबिका देवी (पंजाब), केसरबाई क्षीरसागर (बीड- महाराष्ट्र), लक्ष्मीकुमारी चंदावत (राजस्थान), रत्नाबाई श्रीनिवास राव (तामिळनाडू ), श्यामकुमारी देवी (मध्यप्रदेश), लिला दामोदर मेनन (केरळ), पुरबी मुध्योपाध्याय (प. बंगाल), सविता बेहेन (दिल्ली), प्रतिमा बोस (प. बंगाल), कुमुदबेन जोशी (गुजराथ), सुमित्रा कुलकर्णी

(गुजराथ), सरस्वती डांग (हिमाचल प्रदेश), नारायणदेवी वर्मा (राजस्थान), ज्योस्ना चंदा (आसाम), डी. के. भंडारी (सिक्किम), सुंदरवती नवाल प्रभाकर (करोल बाग), मीरा कुमार (बीजनोर), इंदिरा मायदेव (पुणे- महाराष्ट्र), मैमुना सुलतान (भोपाल), जमुना देवी (मध्यप्रदेश), उषा राणी तोमर (अलिगड), शांती पहारिया (राजस्थान), वीना वर्मा (मध्यप्रदेश), हमिदा हबीबउल्लाह (उ. प्रदेश) , रतन कुमारी (मध्यप्रदेश), नूरजहाँ रझाक (तामिळनाडू ), उषा मल्होत्रा (हिमाचल प्रदेश), रोडा मिस्त्री (आंध्रप्रदेश), इला भट्टाचार्य (त्रिपुरा), चित्रलेखा भोसले (महाराष्ट्र), सूर्यकांता पाटील (नांदेड - महाराष्ट्र), चंद्रिका अभिनंदन जैन (महाराष्ट्र), मैमुना सुलतान (मध्यप्रदेश), सरस्वती प्रधान (ओरिसा), उषी खान (राजस्थान), नीशाबेन चौधरी (गुजराथ), विमला वर्मा (मध्यप्रदेश), उषा मणी ( राजस्थान) प्रभा ठाकूर (राजस्थान), रिता वर्मा (बिहार), भावना चिखलिया (गुजराथ), उमा भारती (खजुराहो), भावना दवे (गुजराथ), वसुंधराराजे शिंदे (राजस्थान - जलवार), ओमवती (पं. बंगाल), मिनानी सेन (पं. बंगाल), एं. के. प्रेमाजन (केरळ), किंम गोंगटे (मणिपूर), मायावती (उ. प्रदेश), बहुजन समाजवादी पक्षाच्या महिला प्रतिनिधी मायावती या उत्तरप्रदेशच्या मुखमंत्री होत्या. ), डॉ. सरोज (तामिळनाडू), डॉ. सगुणा कुमारी (आंध्रप्रदेश), कैलासी देवी (हरियाणा), जयललिता (तामिळनाडू, अण्णाद्रमुक पक्षाच्या नेत्या असून त्या तामिळनाडूच्या मुख्यमंत्री होत्या. 1984 ते 90 त्या राज्यसभेच्या सदस्या होत्या. मनेका गांधी (उत्तरप्रदेश, पिलभीत) इत्यादी महिला प्रतिनिधी लोकसभा व राज्यसभा या गृहात निवडून आलेल्या आहेत. वेळोवेळी संसदेच्या निर्णय निर्धारण प्रक्रियेत आणि चर्चेत कमी अधिक प्रमाणात त्यांचा सहभाग दिसून येतो.

अशा प्रकारे संसदेतील विविध महिला प्रतिनिधींचा जीवनपरिचय अभ्यासल्या नंतर असे आढळून येते की महिला प्रतिनिधींची निवड होण्यामागे विविध घटक कारणीभूत आहेत. राजकीय, सामाजिक, व्यावसायिक, शैक्षणिक आणि आर्थिक दृष्टीकोनातून त्यांना कोणती पार्श्वभूमी लाभली, कोणत्या परिस्थितीमुळे त्यांना प्रतिनिधीत्व प्राप्त करता आले याविषयी मिमांसा करणे आवश्यक वाटते.

ज्या स्त्रियांना कौटुंबिक राजकीय वारसा मिळाला त्यांना राजकारणात प्रवेश करणे सुलभ झाले. श्रीमती इंदिरा गांधी यांना राजकारणाचे बाळकडू पंडित जवाहरलाल नेहरु यांच्याकडून मिळाले. नेहरून घराण्याचा राजकीय वारसा श्रीमती विजयालक्ष्मी पंडित इंदिरा गांधी, शीला कौल, मनेका गांधी यांना मिळालेला आहे. आचार्य कृपलानी यांचा राजकीय वारसा तसेच सी. डी. देशमुख यांचा राजकीय वारसा

त्यांच्या पत्नी सुचेता कृपलानी व दुर्गाबाई देशमुख याना मिळाला होता. गोव्याचे मुखमंत्री दयानंद बांदोडकर यांची कन्या श्रीमती शशिकला काकोडकर यांना राजकीय वारसा प्राप्त होऊन त्या संसदेच्या प्रतिनिधी तसेच गोव्याच्या मुखमंत्री बनल्या. स. गो. बर्वे यांच्या भगिनी ताराबाई सप्रे, वसंतदादा पाटील यांच्या पत्नी श्रीमती शालिनीताई पाटील, आनंदराव चव्हाण यांच्या पत्नी प्रेमलाताई चव्हाण, मधू दंडवते यांच्या पत्नी प्रमिला दंडवते, मौलाना आझाद यांची पुतननात नजमा हेपतुल्ला, कॉम्रेड श्रीपाद डांगे यांच्या कन्या रोझा देशपांडे यांना कौटुंबिक राजकीय परिस्थिती प्राप्त झाल्यामुळे संसदीय प्रतिनिधीत्व सहजपणे प्राप्त करता आले.

श्रीमती गायत्रीदेवी (जयपूर संस्थान), राजमाता श्रीमती कृष्णाकुमारी (जोधपूर संस्थान), श्रीमती विजयाराजे शिंदे (ग्वाल्हेर), श्रीमती वसुंधराराजे शिंदे, श्रीमती विजयाराजे शिंदे (जलवार), श्रीमती विजयमालाराजे भोसले (कोल्हापूर) या स्त्रियांना राजघराण्याचा वारसा प्राप्त झाल्यामुळे त्या खासदार होवू शकल्या. भारतीय समाजात राज्यघराण्याविषयी आदर, प्रेम असल्यामुळे या महिलांना जनतेचा भरघोस पाठिंबा मिळाला.

ज्या महिलांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रात प्रभावीपणे कार्य करून जनमाणसावर आपला ठसा उमटविला त्यांचाही येथे उल्लेख करणे आवश्यक आहे. श्रीमती सरोज खापर्डे, चंदा ज्योस्ना महेष, सावित्री श्याम, सुभद्रा जोशी, अहिल्याबाई रांगणेकर, मृणाल गोरे इत्यादी महिलांनी आपल्या सामाजिक कार्यातून राजकारणात प्रवेश मिळविला. सामान्य, गरीब, कष्टकरी आणि पददलित लोकांच्या विकासासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या या महिला होत.

शेती व्यवसायात असणाऱ्या महिला प्रतिनिधी सोहदराबाई राय (मध्यप्रदेश), मिनीमाता अगमदास गुरू (जंजिर), लक्ष्मी कोतम्मा (आंध्रप्रदेश), राधाबाई आनंदराव (भद्राचलम) यांनी आपल्या कर्तृत्वाने संसदेत प्रवेश मिळविला. वकिली, वृत्तपत्रव्यवसाय, आणि शिक्षण या क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिला प्रतिनिधी संसदेत प्रवेश मिळवू शकल्या. प्रा. सरोजिनी महेषी (पत्रकार व वकिल), मुकुल बॅनर्जी (पत्रकार, सामाजिक कार्यकर्ती), सुशीला नायर (प्राध्यापक), चंपलकांता भट्टाचार्य (संपादक, पत्रकार), जयंती नटराजन (वकिल) सुशीला रोहटगी (प्राध्यापक), मार्गरिट अल्वा (वकिल), गिरीजा व्यास (प्राध्यापक), सुषमा स्वराज्य (वकिल) इत्यादी महिला विविध क्षेत्रात प्रभावीपणे कार्य करून राजकारणात सहभागी झाल्या.

सिनेसृष्टीत प्रसिद्ध असलेल्या अभिनेत्री - महिला नरगीस दत्त, वैजंयतीमाला बाली, शबाना आझमी, जयललिता, जयाप्रदा, दिपीका चिखलिया यांनी आपल्या कलेचा लाभ उठवून राजकारणात प्रवेश मिळविला. पददलित, मागासवर्गिय समाजातील महिला कार्यकर्त्यांना राखीव मतदारसंघाच्या तरतुदीमुळे राजकारणात सहभागी होता आले. विभा घोष, मिनीमाता अगमदास गुरू, सोहदराबाई राय, मायावती इत्यादी महिलांना खासदार होण्याची संधी मिळाली.

अशा प्रकारे संसदेत प्रतिनिधीत्व प्राप्त करण्यासाठी महिलांना विविध घटकांचा फायदा मिळाला असला तरीही एक महत्त्वाची गोष्ट नमूद कराविशी वाटते की प्रतिनिधीत्व प्राप्त करण्यासाठी सामाजिक, राजकीय, आर्थिक किंवा अन्य असा कोणताही घटक आवश्यक असावा लागतो. त्यामुळेच सामान्य स्त्री केवळ आपल्या कर्तृत्वावर राजकारणात प्रवेश मिळवू शकत नाही. काही महिला प्रतिनिधी याला अपवाद असल्या तरीही त्यांचे प्रमाण नगण्य आहे. ज्या स्त्रियांना राजकीय वारसा मिळाला ज्यांचे हितसंबंधी नातेवाईक राजकारणात आहेत आणि ज्यांची सांपत्तिक स्थिती उत्तम आहे अशाच महिला राजकारणात सहजपणे सहभागी होवू शकल्या आणि संसदेत प्रवेश मिळवू शकल्या. हे आतापर्यंत झालेल्या निवडणूकांवरून दिसून येते.

त्याशिवाय स्त्रियांना जी खाती देण्यात आली ती सुद्धा स्त्रियांच्या पारंपारिक भूमिकेच्या आधारावरच देण्यात आली होती. उदा. बहुतांश स्त्री प्रतिनिधींना महिला बाल कल्याण खाते, सांस्कृतिक व युवकांच्या संदर्भातील खाते (कल्याणकारी खाते) देण्यात आलेली दिसतात. जरी स्त्रियांनी विविध खाती कार्यक्षमपणे सांभाळण्याचे सिद्ध केले असले तरी त्यांच्याकडे तंत्रज्ञान, वित्त, संरक्षण किंवा परराष्ट्र खाते अशी खाती फार क्वचित प्रमाणात देण्यात आली. तसेच सर्व अभ्यासावरून असे स्पष्ट होते की निर्णय निर्धार प्रक्रियेत सुद्धा कल्याणकारी विकास क्षेत्र किंवा मानव संसाधन विकास ज्यामध्ये शिक्षण, संस्कृती, महिला आणि बालकल्याण असे विषय समाविष्ट केले जातात. अशा क्षेत्रात जास्तीत जास्त स्त्री प्रतिनिधींनी सहभाग घेतलेला दिसतो. यावरून असे स्पष्ट होते की ज्या ज्या स्त्री प्रतिनिधींनी सहभाग घेतला तो सहभाग स्त्रियांच्या प्रश्नांच्या संदर्भात होता. स्वास्थ कल्याणकारी योजना स्त्रियांविरूद्ध होणारे अत्याचार, हुंडाबळी किंवा मानवी हक्कांचे उल्लंघन अशा विषयांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग दिसून येतो. त्यातूनही 8 % स्त्रियांपैकी काही थोड्या स्त्रिया ज्या दोन टक्क्यापेक्षा अधिक होणार नाहीत. एवढ्याच स्त्रियांनी

जाणीवपूर्वक सहभाग घेतलेला दिसतो. संरक्षण, वित्त किंवा परराष्ट्र संबंध, आंतरराष्ट्रीय संबंध अशा प्रश्नांत स्त्री- प्रतिनिधी अल्प प्रमाणात सहभागी झालेल्या दिसतात.

वरील स्पष्टीकरणावरून एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो की ज्या अल्पप्रमाणात स्त्रिया निवडून आल्या होत्या त्या खरोखरच स्त्रियांचे प्रश्न स्थिती आणि स्त्री दृष्टीक्षेप असणाऱ्या होत्या का? तसेच त्या महिला राजकीय पक्षातर्फे निवडून आलेल्या आहेत. त्याच राजकीय पक्षाच्या दबावाखाली आणि त्यांच्या मार्गदर्शनाच्या चौकटीत वावरताना त्या दिसतात. स्त्री चळवळीच्या माध्यमातून या स्त्री प्रतिनिधींवर दबाव आल्यामुळे स्त्रियांच्या उन्नतीसाठी जरी नविन कायद्याची फलश्रृत्ती झाली असली तरीही मुलत: या कायद्यामार्फत स्त्रियांचे शोषण करीत असणारे सामाजिक आणि रचनात्मक पाया यांना खरे आव्हान या कायद्याच्या माध्यमातून स्त्री- चळवळ देवू शकली नाही.

स्त्री प्रतिनिधींच्या भूमिकेचा अभ्यास करीत असताना यापूर्वी स्पष्ट केल्याप्रमाणे ज्या स्त्रिया प्रतिनिधी म्हणून निवडून आलेल्या आहेत. त्या बहुतांशी राजकीय, कौटुंबिक पार्श्वभूमी, सामाजिक व राजकीय क्षेत्रात प्रभावीपणे कार्य करणाऱ्या जमीनदार वर्गातून, सिनेसृष्टीत प्रसिद्ध असलेल्या पार्श्वभूमीवरून निवडून आल्याचे स्पष्ट होते. त्यातूनही बऱ्याच मोठ्या प्रमाणात निवडून आलेल्या स्त्रिया ह्या कोणत्या ना कोणत्या राजकीय पक्षाच्या पाठिंब्यामुळे निवडून आलेल्या आहेत. त्यामुळे जेव्हा जेव्हा या प्रतिनिधींकडून सहभाग होण्याचे साहस झाले तेव्हा तेव्हा त्या राजकीय पक्षाकडून त्यांच्यावर दबाव आणल्याचे दिसून येते. उदा.अलिकडेच उमा भारतीनी मागासवर्गीय स्त्रियांसाठी राखीव जागांच्या तरतुदीशिवाय महिला विधेयक मंजूर करू नये अशी मागणी केल्यानंतर भारतीय जनता पक्षांकडून त्यांच्यावर दबाव आणण्यात आला आणि पक्षांची भूमिका ठरल्याशिवाय पक्षप्रतिनिधींनी अशा प्रकारची भूमिका कोणत्याही धोरणाच्या संदर्भात मांडू नये असे संकेत करण्यात आले. याचा अर्थ असा होतो की सर्व स्त्री-प्रतिनिधींकडून स्त्रियांच्या हिताच्या दृष्टीकोणातून आणि दृष्टीक्षेपातून प्रश्न सोडविले जातीलच अशी खात्री देता येत नाही. तसेच सर्व स्त्री प्रतिनिधींकडून कार्यक्षम आणि सक्रिय सहभाग होईलच यांची अपेक्षा करता येत नाही. कारण लोकसभेत 8% स्त्री प्रतिनिधी असल्या तरी त्यापैकी फारच अल्प प्रमाणात स्त्रिया सहभागी झालेल्या दिसून येतात. संसदीय पातळीवर दर्जा प्राप्त करून घरगुती, कौटुंबिक आणि जातीय पुरूषप्रधान समाज रचनेतून स्त्री बाहेर पडली असली तरीही राजकीय पक्षाच्या अंतर्गत असणारी पुरूषप्रधान सत्तारचना ही अजूनही अस्तित्त्वात

असल्यामुळे स्त्री प्रतिनिधींना या रचनेच्या दबावाअंतर्गत कार्य करावे लागते असे स्पष्ट होते.

11 व्या लोकसभेत 388 सभासदांपैकी 103 स्त्री उमेदवारांना विविध राजकीय पक्षांच्या मार्फत पाठिंबा देण्यात आलेला दिसतो. त्यामध्ये काँग्रेस पक्षाने सर्वात जास्त म्हणजे 16 स्त्री उमेदवारांना पाठिंबा दिला भाजपने 14, जनता दल आणि मित्र पक्षानी 9 स्त्री उमेदवारांना पाठिंबा दिल्याचे दिसून येते.

12 व्या लोकसभेत काँग्रेस पक्षाने 39 महिलांना उमेदवारी दिली होती तर भाजपने 30 महिलांना उमेदवारी दिली होती, बाकी इतर पक्षांनी फारच अल्प प्रमाणात स्त्रियांना उमेदवारी दिली होती.

या पाठीमागचे कारण असे की स्त्रियांना खरोखरच राजकारणात सहभागी करून घेण्याच्या हेतूने नसून राजकीय पक्षाचा एक व्यूहरचनेचा भाग म्हणूनच स्त्रियांना समाविष्ट करुन घेण्यात आलेला आहे. वरील अभ्यासावरून स्त्रियांचा संसदेतील सहभाग आणि भूमिका यासंबंधी पुढील निष्कर्ष काढता येतील

1) स्त्रियांना ठराविक राजकीय, सामाजिक, आर्थिक पाठबळ असल्याशिवाय त्या संसद पातळीवर सहभागी होवू शकत नाहीत.

2) बहुतांशी स्त्री प्रतिनिधी उच्च वर्गातून आलेल्या आहेत हे स्पष्ट होते.

3) पुरूषांप्रमाणे विविध प्रातांतून त्या त्या प्रदेशात वर्चस्व असणाऱ्या जाती जमातीच्या स्त्रियांना प्रतिनिधीत्वाची संधी देण्यात येते. उदा. कर्नाटक मध्ये वक्कलिगा - लिंगायत या जातीच्या स्त्रियांना प्रतिनिधीत्वाची संधी दिली जाते. याचा अर्थ पारंपारिक पद्धतीने चालत आलेल्या जात, धर्म, जमात यांचा पुरूषप्रधान राजकारणावर जसा परिणाम व प्रभाव होता व आहे तशाच प्रकारचा प्रभाव स्त्रियांच्या संदर्भातही दिसून येतो.

4) राजकारणात स्त्रिया सक्रिय सहभागी होत नाहीत. राजकीय अज्ञान, राजकीय पक्षाचे वर्चस्व, प्रशिक्षणाचा अभाव,राजकीय कार्याच्या अनुभवाचा अभाव आणि त्यांच्यावरील असणारा पती, पिता, भाऊ यांचा दबाव व वर्चस्व यामुळे स्त्रियांना राजकारणात सहभागी होता येत नाही.

5) विशेषत: स्त्री प्रतिनिधीत्व आणि सामान्यत: स्त्री सहभाग अल्पप्रमाणात असण्यामागचे महत्त्वाचे कारण म्हणजे राजकीय पक्षाच्या अंतर्गत असणारा स्त्री प्रश्नविषयक वैचारिक आधार आणि जाणीव, त्याचबरोबर मतदानाचे महत्त्व त्याबद्दलची जाणीव आणि जागृती स्त्री गटामध्ये आढळून

येत नाही.

6) आतापर्यंत कोणत्याच राजकीय पक्षाकडून स्त्रियांना राजकारणात सहभागी होण्याबाबत उत्तेजीत करण्याचा गांभीर्याने विचार व प्रयत्न झालेला नाही.

7) स्त्रियांना नेहमी राजकारणाविषयी रूची नसणारा किंवा राजकारणाविषयी माहिती नसणारा घटक म्हणूनच कमी लेखले जाते. जोपर्यंत राजकीय पक्षाकडून स्त्री प्रतिनिधीत्व वाढीचा प्रयत्न होत नाही तोपर्यंत त्यांचे प्रतिनिधीत्व वाढण्याची शक्यता कमी दिसते.

8) स्त्री- प्रतिनिधींना पारंपारिक भूमिकेच्या आधारावरच कार्य सोपविलेले दिसते. उदा. मंत्रीपदे - टक्केवारी प्रतिनिधित्व नुसार दिलेली दिसतात.

9) स्त्री आर्थिक दृष्ट्या परावलंबी असल्यामुळे तिला निवडणुकीचा अवाजवी खर्च न पेलणारा असतो. त्यामुळे त्यांचा राजकीय सहभाग कमी आहे.

10) राजकारणातील गुन्हेगारीमुळे स्त्रिया राजकारणापासून वंचित होतात. धकाधकीच्या गुंडगिरीच्या राजकारणापासून स्त्रिया अलिप्त राहताना दिसतात.

11) पंचायती राज व्यवस्थेत एक लाखाहून अधिक महिला-प्रतिनिधी सहभागी झाल्या असल्या तरी सामाजिक परिवर्तनाची दृष्टी त्यांना असलेच असे नाही. उदा. कर्नाटक मध्ये स्त्रियांना 30 टक्के आरक्षण मिळून 10 वर्षापेक्षाही जास्त काळ झाला असला तरी तेथे सामाजिक परिवर्तन घडल्याचे दिसत नाही आणि स्त्रियांचा सामाजिक, आर्थिक दर्जाही सुधारलेला नाही.

<u>संदर्भ</u> -


1) J. k. Chopra
Women In the Indian Parliament
(A critical study of their Role)
Mittal Pubications (new Delhi)
Page- 34

2) Fourth World Conference on Women.
Beijing - 1995
Contry Report.
Page No. 24

3) J. k. Chopra
Women In the Indian Parliament
(A critical study of their Role)
Mittal Publications (new Delhi)
Page- 35

4) All India Gazettes Extraordinary, part II,
Section II from 1950-1990
p.p. 563-64 (of 1950 Gazette)

5) Ibid.
P. p. 237- 241

6) Ibid.
P. p. 413- 416

7) Ibid.
P. p. 436- 438

8) Ibid.
P. p. 1- 6


SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

9) ``स्त्रियांच्या जागतिक परिषदेत भारताची कामगिरी``
साधना अंक 5, पृ. 3
संपादक वसंत बापट, ग. प्र. प्रधान
16 सप्टेंबर 1995
पृ. नं. 3

10) All India Gazettes Extraordinary, part II,
Section II from 1950-1990
p.p. 125-129

11) Ibid,
P. p. 940- 944

12) Ibid,
P. p. 17- 19

13) Ibid,
P. p. 10- 12

14) Ibid,
P. p. 515- 527

15) Ibid,
P. p.1040- 1045

16) Ibid,
P. p. 882- 883

17) Ibid,
P. p. 511- 518

18) Ibid,
P. p. 1153- 1161

19) Ibid,
P. p. 963- 980

20) Ibid,
P. p. 11 - 15

21) Ibid,
P. p. 17 - 19

22) Ibid,
P. p. 3- 6

23) Ibid,
P. p. 564 - 565

24) Ibid,
P. p. 444 - 458

25) Ibid,
P. p. 1971- 1977

26) Ibid,
P. p. 981 - 987

27) Ibid,
P. p. 157 - 158

28) Ibid,
P. p. 1 - 5

29) Ibid,
P. p. 54 - 59

30) Ibid,
P. p. 53 - 55

31) Ibid,
P. p. 1 - 3

32) Ibid,
P. p. 1 - 24

33) India's Parliament 1971

Who's who of Indian (MPS)

Editor - V. S. Kulkarni, Publishers - Law Book House, Poona - 30

First Edition

P. 344, 345

34) India, who's who, 1987

INFA Publications

Jeevan Deep,

Parliament Street,

New Delhi.

p. 54 a

35) Encyclopaedia of India's Parliament - 1971

Editor - V. S. Kulkarni

Pubilsher - Law Book House, Poona - 30

P. 260 - 261

36) Ibid,

P. p. 71

37) India who's who 1987

INFA Publications

Jeevan Deep,

Parliament Street,

New Delhi.

p. 54 a

38) All India Gazettes Extraordinary, part II,

Section II from 1950-1990

p.p. 11 - 15

39) Ibid,

P. p. 11 - 15

40) Ibid,
P. p. 1 - 24

41) Ibid,
P. p. 1- 2

42) All India Gazettes Extraordinary, part II,
Section II from 1950-1990
p.p. 447 - 48

43) Ibid,
P. p. 1- 13

44) Ibid,
P. p. 1- 7

45) Encyclopaedia of India's Parliament - 1971
Editor - V. S. Kulkarni
Pubilsher - Law Book House, Poona - 30
First Edition - 1971
P. 418

46) All India Gazettes Extraordinary, part II,
Section II from 1950-1989
p.p. 1025 - 26

47) Ibid,
P. p. 291 - 97

48) गवाणकर रोहिणी - `संसदेतील कार्य`
``मराठी स्त्री शक्तीचे राजकारणी रूप``
आदित्य प्रकाशन, आवृत्ती पहिली, 1986.
पृ. 149, 150

49) कित्ता , पृ. 150, 151

50) कित्ता, पृ. 152

51) कित्ता, पृ. 153, 154

52) कित्ता, पृ. 154, 155

[stamp]